परस्परं भावयन्तः
म प्र
मराठे प्रतिष्ठान, मुंबई यांचे मुखपत्र
# हितगुज
अंक १०६ ✿ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✿ जून २०१६
Website : www.marathepratishthan.org (फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय

*प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना*
***माझा सस्नेह नमस्कार.***

दि. २३ व २४ जानेवारीला आपण सांगली येथे कुलसंमेलनात भेटलो. मार्च महिन्याच्या 'हितगुज' अंकात सविस्तर संमेलन वृत्त प्रकाशचित्रांसह प्रसिद्ध केलं. खूप जणांना मनापासून संमेलनाला यायची इच्छा होती पण तब्येतीच्या कारणामुळे किंवा काही इतर कारणांमुळे ते संमेलनाला येवू शकले नाहीत त्यांनाही संमेलनवृत्त वाचून छान वाटले असेल कारण उत्सुकता असते ना संमेलन कसे पार पडले. कोणते कार्यक्रम ठेवले होते, जेवणाची-राहण्याची व्यवस्था कशी होती इ. म्हणून संमेलनाविषयी जास्त लिहिलं गेलं तसेच जे उपस्थित होते त्यांनाही पुनः प्रत्ययाचा आनंद झाला असेल. मराठे प्रतिष्ठान, सांगलीकर मराठे तसेच संमेलन यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेणारे मराठे युवक कार्यकर्ते या सर्वांना धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच! असो.

### अद्‌भूत आणि विलक्षण

मंडळी आपले मराठे प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. रमाकांत माधव विद्वांस यांचे 'मुसाफिराच्या आठवणी' हे पुस्तक नुकतेच वाचले. (अगदी विकत घेऊन वाचले) पुस्तक वाचून भारावून गेले आणि दोनच शब्दांत वर्णन करायचं झाल्यास 'विलक्षण, अद्‌भूत' एवढेच शब्द ओठावर आले. संबंध पुस्तक वाचून चकित व्हायला होतं, मी तर स्तिमितच होऊन गेले. केवढा मोठा माणूस हा, किती प्रचंड कार्य केले याने, 'स्तुती करावी भगवंताची.... व्यर्थ करू नये मानवाची' असे म्हणतात पण मी तर आज या 'संपादकीय' मधून लेखकावर मुक्त हस्ताने स्तुतीसुमने उधळणार आहे. पुस्तकाचे नाव ही सार्थ 'मुसाफिराच्या आठवणी' हा लेखक स्वतःला 'मुसाफीर' म्हणवून घेतो. हे प्रवासवर्णन आहे का? याला 'आत्मचरित्र' म्हणावे का? दिवंगत प्रिय पत्नीच्या विरहदुःखाने व्याकुळ झालेला, तिच्या आ ठवणीत रमणारा व त्यात आनंद घेणारा - पत्नीच्या आठवणींचे, स्मृतींची चाळता पाने असे या पुस्तकाचे स्वरूप आहे का?

माझ्या मते, या पुस्तकाला कोणत्याही आकृतीबंधात बसवू नये. साहित्यिक बांधणीच्या, वाङ्‌मयीन घाटात (Form) बसवू नये. तशी आवश्यकताही नाही. आत्मचरित्र, प्रवासवर्णन, आठवणी अशा घाटात पुस्तकाची वर्गवारी करू नये. कारण हे पुस्तक म्हणजे प्रवासवर्णन आहे. हे पुस्तक म्हणजे आत्मचरित्र आहे आणि हे पुस्तक म्हणजे लेखकाच्या प्रिय पत्नीच्या आठवणींचे आहे. असा तिहेरी पेड ज्याला तिहेरी पेडाची वेणी किंवा तिहेरी गोफ जणु विणला आहे असे हे पुस्तक आहे. लेखक चतुर आहे स्वतःला मुसाफीर म्हणवून घेतो. मला वीणा देवांनी गो. नी. दांडेकरांवर एक पुस्तक लिहिले आहे त्याचे नाव 'अशक मस्त मुसाफीर' हे होते.

**दहावी व बारावी परीक्षांचे निकाल आले आहेत. पदवी परीक्षांचेही यथावकाश येतील. या परीक्षांमध्ये यशस्वी झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचे प्रतिष्ठानतर्फे हार्दिक अभिनंदन. या विद्यार्थ्यांसाठी प्रतिष्ठानने भरघोस पारितोषिके ठेवली आहेत. त्याविषयी अधिक माहिती पृष्ठ क्र. २२ वर आहे. सर्व पारितोषिक पात्र विद्यार्थ्यांनी दि. १५ जुलै पर्यंत गुण पत्रिकेची प्रत इमेलने/प्रतिष्ठानच्या पत्त्यावर पत्र पाठवून संपर्क साधावा.**

● **कार्यवाह :** हेमंत : hemant.a.marathe@gmail.com ● **कोषाध्यक्ष :** श्रीनिवास : Shriniwas_marathe@yahoo.com

संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०००३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९ ● इ-मेल : parbhakar.marathe@gmail.com
मुद्रक : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई - ४०००३१

त्याच्याशी काही तरी या मुसाफीराचे साधार्म्य आहे की काय असे एक क्षण वाटून गेले. असो.

ओघवती भाषा, आसपास पाहाण्याची चौफेर दृष्टी, सखोल निरीक्षण आणि वाचताना गुंतवून ठेवण्याची हातोटी या गुणवैशिष्ट्यांमुळे मराठी साहित्यविश्वात या पुस्तकाने मोलाची भर घातली आहे हे निश्चित.

**समृद्ध व्यक्तिमत्त्व**

लेखकाचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी, समृद्ध आहे. पुस्तक वाचताना आपलेही ज्ञान वाढत जाते. अनेक नव्या क्षेत्रांची माहिती होत जाते. इंजिनियरींग मधल्या अनेक गोष्टींचे तपशील, बारकावे आपल्याला लेखक सहजपणे समजावून सांगतो आहे, मोकळेपणाने गप्पा मारतो आहे त्याविषयी असे वाचताना जाणवते. (उदा. बोगदे खोदतानाचे तंत्र पृ. ४२) नाविन्यपूर्ण गोष्टी वाचून आपणही प्रगल्भतेचा आनंद घ्यायला पात्र ठरतो. मला वाटतं ही या पुस्तकाची शक्ती आणि लेखकाची बलस्थाने आहेत. कठीण कठीण प्रकल्प लेखक यशस्वीपणे तडीस नेतो वाटेत कितीही अडथळे आले, खूप अडचणी आल्या तरी त्या सर्वांवर हा 'स्थापत्यविशारद' मात करताना दिसतो. आजही वार्धक्यकाळात, प्रकृति कमी-जास्त असली तरी कामे चालूच आहेत. नो एंड कामांना अंत नाही आणि हा इंजिनियर आपली 'गुणवत्ता' आणि 'उपयोगिता' सिद्ध करतो.

**कृतज्ञता**

प्रामाणिक, प्रांजळ आत्मकथन, कुठेही आत्मप्रौढी नाही, अहंकाराचा दर्प नाही, नम्रपणे कबूली देतो - लेखक उत्तम, यशस्वी व्यावसायिक आहे त्या यशाचे श्रेय आपली दिवंगत परम प्रिय पत्नी सौ. शुभा हिला देतो. तसेच 'हिंदुस्थान कंस्ट्रक्शन कंपनी' (एच.सी.सी.) विख्यात स्थापत्यविशारद कै. सी.बी.

(पृष्ठ ३ वर पहा)

# चतुरस्त्र पूर्वाचं अभिनंदनीय यश



पर्ये येथील श्री. भूमिका उच्च माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी कु. पूर्वा विष्णू मराठे हिने कला शाखेतून ९२.३३% गुण प्राप्त करून विद्यालयात आणि सत्तरी तालुक्यात प्रथम येण्याचा मान पटकावला आहे. डिचोली येथे राहणारी पूर्वा आपल्या राहत्या तालुक्यातूनही प्रथम आली आहे. इतिहास ९१, हिंदी ९२, संस्कृत ९८, अर्थशास्त्र ९७ व राज्यशास्त्र ९९ अशा पाच विषयात ९०%च्या वर मार्क मिळवून प्राप्त केलेल्या घवघवीत यशामुळे पूर्वावर समाजातील सर्व थरांतून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

तिच्या यशाबद्दल पिता श्री. विष्णू वसंत मराठे व माता सौ. पूजा विष्णू मराठे यांनी तिचे गुरुजन व हितचिंतकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली आहे. कु. पूर्वा हिचे प्राथमिक शिक्षण मातृभाषेतूनच (मराठी) झाले आहे. तिने केलेले परिश्रम, तिने व बंधू वेद यांनी केलेला दूरदर्शनचा त्याग व शिक्षकांनी घेतलेल्या मेहनतीमुळे हे यश लाभले आहे. आजोबा कै वसंत विष्णू व आजी श्रीमती. अन्नपूर्णा वसंत तसेच श्री. योगेश्वरी देवीचे आशीर्वाद लाभले असल्याची कु. पूर्वाची भावना आहे.

पूर्वाला नाट्य, कीर्तन व विविध कार्यक्रमांचे सूत्रसंचालन याची आवड आहे. अभिनयाची कार्यशाळाही तिने केलेली आहे. विविध समारंभ आणि स्पर्धांमधून एकपात्री प्रयोग, वेशभूषा, साभिनय काव्यवाचन सादर करून त्यात यश प्राप्त केलं आहे. साने गुरुजी कथामालेच्या तालुका व राज्यस्तरीय स्पर्धांतून अनेक बक्षिसे मिळवली आहेत. चित्पावन ब्राह्मण संघ, 'गोमंतक'च्या संस्कार संवर्धन संघाच्या सचिव पदाची धुरा ती सांभाळत आहे. बुद्धिबळ हा तिचा आवडता खेळ आहे. तसेच या सर्वांचा परिपाक म्हणून की काय, आपल्या उच्चमाध्यमिक विद्यालयाची 'आदर्श विद्यार्थिनी' हा किताब यावर्षी तिनं मिळवला आहे.

संस्कृतचा 'शिक्षक प्रशिक्षण वर्ग' केल्यानं संस्कृतची शिबिरे घेऊन इतरांना शिकवावं अशी तिची इच्छा आहे. संस्कृत विषयात पदवी संपादन करायची तिची मनीषा आहे. अर्थशास्त्राची पदवीधर झाल्यानंतर UPSC ची परीक्षा देऊन IAS Officer होण्याची महत्वाकांक्षा बाळगणाऱ्या पूर्वाच्या सर्व मनोकामना पूर्ण होवोत, तिच्या भावी आयुष्यात तिला असेच उदंड यश लाभो व सर्वात महत्त्वाचं म्हणजे एक उत्तम व्यक्ती म्हणून नावलौकिक तिला प्राप्त होवो अशी त्या देवी श्री योगेश्वरी व श्री. देव व्याडेश्वरा चरणी प्रार्थना !!!! मराठे प्रतिष्ठानतर्फे कु. पूर्वाचं हार्दिक अभिनंदन.

नुकत्याच हाती आलेल्या बातमीनुसार कु. पूर्वाच्या या सुयशाच्या गौरवार्थ मराठे प्रतिष्ठान तर्फे देण्यात आलेल्या विशेष पारितोषिकाचा रु. ५०००/- चा धनादेश दि. २९ मे रोजी गोमंतक मराठे परिवार'च्या वार्षिक संमेलनात रमेश कृष्णाजी मराठे यांच्या हस्ते तिला प्रदान करण्यात आला.

जोशी हे मार्गदर्शक गुरू, सल्लागार परमस्नेही ॲडव्होकेट विनय पटवर्धन, खास मित्र भा. ल. महाबळ या सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त करताना दिसतो. हा लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा उल्लेखनीय पैलू आहे. त्याच्या मनाचा मोठेपणा दिसतो.

### दायित्व

एक प्रकारचा समजूतदारपणा जबाबदारीचे भान ठेवणारा, आणि संवेदनक्षमता हे पराकोटीचे दुर्मिळ गुण लेखकाच्या ठायी आहेत. ऐन तारुण्यात वडीलांचे ऐकणारा आज्ञाधारक मुलगा त्यांना न दुखवता, कुटुंबियांच्या भावना जपणारा असा हा लेखक या पुस्तकात आपल्यात भेटतो. लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा आदर्श पैलू म्हणता येईल तो दिसतो.

त्याचप्रमाणे लेखकाचा धाडसीपणा, शूरता या गुणांचा प्रत्ययही येतो. उदाहरण द्यायचे झाले तर संपकरी युनियन कामगार आणि कंत्राटी कामगार यांच्यात भांडणे होऊन दोन कामगार जखमी होतात तेव्हा न डगमगता, न कचरता लेखक कामगारांना शांत राहण्याचे आवाहन करतो पुढे पोलिस येऊन कारवाई करतात हा भाग नंतरचा (पृ.३४)

प्रवासवर्णन लिहितानाही त्या स्थळाची भौगोलिक माहिती देतात. त्या स्थळाचे वैशिष्ट्य सांगतात. त्या मागचा साद्यंत इतिहास सांगतात. उदा. (पृ.४८) महान मारीब डॅम - आठवे आश्चर्य. जगप्रसिद्ध सौंदर्यसम्राज्ञी बिल्किस ही शीबा राजाची राणी होती. इ. ऐतिहासिक माहिती पुरवितात. लेखकाचा एक पाय घरात तर एक पाय दारात असे असतानाही, ''गॅलीतील गोकुळात तुम्हाला पाहून मला कळले की तुम्हाला प्रवासाचा कंटाळा का येत नाही'' हे लेखकपत्नी सौ. शुभाताईंचे भाष्य महत्त्वाचे ठरते.

लेखकाने हंगेरीयन लोकांबरोबर तांत्रिक सहकार्य कराराचा कच्चा मसुदा तयार केला. तो एच.सी.सी.चे मुख्य व्यवस्थापक यांना अतिशय आवडला आणि निकेक्स या हंगेरीयन कंपनीच्या कार्यालयात मुख्य व्यवस्थापक आणि हंगेरीयन कंपनीचे मुख्य व्यवस्थापक यांनी करारावर सह्या केल्या. लेखक म्हणतो, ''तांत्रिक सहकार्य करण्याचे नवे दालन मला खुले झाले हा माझ्या आयुष्यातील अभिमानाचा क्षण होता'' भारतीय कंपनीशी पहिला करार करण्याचे भाग्य लेखकाला लाभले. आणि युरोप व अमेरिका या देशांतील राष्ट्रप्रमुखांचे मनोगत आणि सह्या ज्या पुस्तकात होत्या त्याच पुस्तकात आपल्या या लेखकाने त्यांच्या कंपनीविषयीचे मनोगत आणि सही लिहिली लेखकासाठी हा 'मानाचा तुरा' होता अशा शब्दात लेखक आपल्या भावना व्यक्त करतो. तेव्हा ते वाचून आपलीही मान अभिमानाने ताठ होते आणि डोके नतमस्तक होते.

### मजबूत बांधणी

लेखक स्वतः सिव्हील इंजिनियर, मजबूत, भक्कम पूलबांधणी, धरणे, बोगदे इ. सर्व बांधकाम पक्के व मजबूत त्याप्रमाणे पुस्तकाची बांधणी मजबूत. जाड, भक्कम, उत्तम प्रतीचा कागद वापरला आहे. पुस्तकातील फोटो तर काय विचारूच नका. लाजबाब!

हे आठवणींचे उत्कृष्ट पुस्तक लेखकाने परमप्रिय पत्नी कै. सौ. शुभा विद्वांस हिला सादरपूर्वक अर्पण केले आहे. पुस्तकाच्या विक्रीतून जमलेले पैसे कै. सौ. शुभाच्या स्मृती प्रीत्यर्थ मुलींच्या अनाथाश्रमास देणगी म्हणून दिले जाणार आहेत.

हे पुस्तक परीक्षण नव्हे तर 'मुसाफीराच्या आठवणी' वाचून मी भारावून गेले, मनात विचारांची गर्दी जमली आणि एक संज्ञाप्रवाह सुरू झाला त्यात लिहित गेले आणि ते 'संपादकीया'त उतरले. मंडळी, पाहा आवडते का आणि हे पुस्तक वाचायला मन अधीर होते का? असो.

आपली शुभचिंतक

**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे,** (पृ. १२०),

(दि. ११ मे २०१६, श्री शंकराचार्य जयंती)

# आमची पंचाहत्तरी

मराठे प्रतिष्ठानचे आधारस्तंभ श्री. वामन गणेश मराठे (पृ.५०३) दि. १० डिसेंबर २०१६ ला पंचाहत्तरीत प्रवेश करीत आहेत. त्यासाठी त्यांनी सर्व कुलबांधवांना आवाहन करून आमंत्रित केले आहे. ७५ वर्षे असलेले कुलबांधव आणि ७० ते ७५ वयोगटातल्या कुलभगिनींची पंचाहत्तरी साजरी होणार आहे. या वयोगटातल्या ज्येष्ठ कुलबांधव-भगिनींनी आपले अनुभव, बालपण, शिक्षण, व्यवसाय, नोकरी, आठवणीतील क्षण, आयुष्यातील सोनेरी क्षण, कठीण प्रसंग, सामाजिक कार्य, छंद संगीत व इतर याविषयी लिहून पाठवावे ते साहित्य हितगुजमध्ये प्रकाशित करण्यात येईल. शब्दसंख्या मर्यादित एक हजारपर्यंत.

### कार्यक्रम स्थळ

**मुंबई -** निश्चित करण्यात येईल ते कळवू. **(मुख्य पाहुणे आपणच वयोवृद्ध व्यक्ती)**

**संगीतबद्ध, कलावंत आपले आपण - स्वयंसेवकासहित ● कालावधी २ ते ३ तास वेळ सकाळी १० ते ३ पर्यंत**

**● चहापाणी - जेवणखाणाची व्यवस्था केली जाईल.देणगी -** ऐच्छिक ● **प्रेषक -** श्री. वा. ग. मराठे, पुणे

**● दूरध्वनी -** ०२०-२५८६१७०० **● भ्रमणध्वनी -** ९३२४७८०३४५

# देव मल्हारी म्हाळसाकांत अर्थात खंडोबा

• **नंदकुमार मराठे**, कोल्हापूर
दूरध्वनी - ०२३१-२५४१८२३

**प्रस्तावना**

भारतीय हिंदू संस्कृतीत अनेक देव-देवतांची महती सांगितली आहे. काही देव-देवतांची देश पातळीवर तर काही देव-देवता प्रादेशिक पातळीवर सुपरिचित आहेत. पैकी दक्षिण भारतात, विशेषतः महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रांतात देव मल्हारी-म्हाळसाकांत अर्थात खंडोबा हे देवस्थान लोकाभिमुख आहे. खंडोबा अठरा पगड जातींच्या लोकांचा कुलदैवत व लोकदैवतही आहे.

**अवतार**

या देवतेबाबत प्राचीन कथेत कृतयुगात मणिचुळ पर्वतावर धर्मपुत्र सप्तर्षी तप करीत असत. मणी व मल्ल या दैत्यांनी ऋषींचे तप उद्ध्वस्त केले. त्यावेळी हे ऋषी ब्रह्मदेव व विष्णुदेवाकडे गेले. भगवान विष्णूंनी त्यांना भगवान शंकरांकडे पाठविले. भगवान शंकरांनी मार्तंड भैरवाचे रूप धारण केले. भगवान शंकराचे चिरंजीव कार्तिकेय यांनी सात कोटी यळकोट गणांचे सैन्यासह मल्लाचा पराभव केला. त्यावेळी मल्लांनी शरण येऊन मार्तंड भैरवांना विनंती केली की, ''हे मार्तंड भैरव देवा, माझ्या मृत्यूनंतर माझे नांव तुमच्या नावाअगोदर लावावे व मला मुक्ती द्यावी.''

त्यावेळी मल्लारी मार्तंडाने 'तथास्तु' म्हटले आणि मल्लारी मार्तंड भैरव असा अवतार झाल्याचे संदर्भ आढळतात. हा ६८ भैरवांपैकी एक होय.

**कुलदैवत**

हा देव मल्लारी, मैलार, खंडोबा, मल्हारी, सदानंद मार्तंड भैरव, म्हाळसापती, मल्हारी मार्तंड आदी विविध नावांनी परिचित आहे. हा मल्लारी भारतातील लाखो कुटुंबाचा कुलदैवत आहे. भगवान शंकराचा एक अवतार म्हणून या खंडोबाची ओळख आहे.

मार्गशीर्ष मासातील चंपाषष्ठी ते पौर्णिमा हा या देवाचा नवरात्रोत्सव कालावधी आहे. निर्णयसिंधूत याचे उल्लेख आढळतात.

**देवाचा नैवेद्य**

कणकेचा रोडगा, वांग्याचे भरित, पातीचा कांदा, लसूण, जोंधळ्याचे पीठ व दही आदी महानैवेद्याचे पदार्थ देवाला आवडतात. महानैवेद्याबरोबर तळी भरणे, दिवटी व बुधली घेऊन आरती करणे, भंडारा उधळणे वगैरे विधी 'कुलधर्म कुलाचारात' दर्शविले आहेत. बऱ्याच कुटुंबात चातुर्मास ४ महिने म्हणजे आषाढ शुद्ध एकादशी ते कार्तिक शुद्ध एकादशीपर्यंत कांदा, लसूण, वांगी वगैरे पदार्थ वर्ज्य असतात. तर मल्हारी भक्तात चंपाषष्ठीपर्यंत हे पदार्थ वर्ज्य करण्याची प्रथा आहे.

**कुलाचार**

रविवार हा खंडोबाचा दिवस म्हणून ओळखला जातो. या शिवाय खंडोबाचे जागर, पाचपावली, कौटुंबा पूजन, दिवटीपूजन, ओझं उतरणे, तळी भरणे, लंगरतोड, आदी धार्मिक विधी या देवाचे उत्सवात केले जातात. देव गणपती, जोतिबा, दत्त, श्रीराम, श्री महालक्ष्मी, तुळजाभवानी याप्रमाणे खंडोबाचे ही नवरात्र असते.

**जागर**

खंडोबा हा ज्यांचा कुलस्वामी आहे त्यांच्यात लग्न, मुंजीनंतर जागर करण्याची प्रथा आहे. दिमडी, तुणतुणे, घाटी, मंजिरी, आदी वाद्यांचा उपयोग आरती, जागराच्या गाण्याचे वेळी केला जातो. जागराचे वेळी खंडोबा व बाणाई, मल्हारी-म्हाळसा यांच्या लग्नाची कथा ऐकवली जाते. खंडोबाची गाणी, कथा, स्तोत्रे, आरती संग्रह, कवच वगैरे वाङ्मय उपलब्ध आहे. गोंधळाप्रमाणे ५ ऊसाचे मखरात प्रतिकात्मक मल्लारीची स्थापना करून वाघ्या-मुरळींना नाचवून जागर करण्याची प्रथा आढळते. या खंडोबाला क्षेत्रपाल देवता म्हणूनही संबोधतात. गोंधळ, जागरण, भराड हेही कुलधर्म.

**वाघ्या मुरळी**

काही भक्त देवाला नवस बोलतात. यावेळी नव वधुवर देवाला गाऱ्हाणे घालतात की, मुलगा झाला अथवा मुलगी झाली तरी तुझ्या सेवेला त्यांना अर्पण करीन. मुलगा झाल्यास तो वाघ्या व मुलगी झाल्यास ती मुरळी म्हणून देवाच्या सेवेला वाहतात, ही रूढी दिसून येते. पुढे हे वाघ्या-मुरळी जागराचे माध्यमातून देवांच्या कथा, कुलधर्म कुळाचाराच्या कथा - जागरकथा म्हणून तालावर नाचून-गाऊन सांगतात. वाघ्या व मुरळीचे लग्न चैत्र महिन्यात करण्याची प्रथा आहे. तथापि, नव्या वैचारिक परिवर्तनातून आता लोकशिक्षणाची जनजागृती झाल्याने वाघ्या आणि मुरळीच्या प्रवेशाला खंडीतता आली आहे.

**तळी भरणे**

घरी आल्यावर घरच्या देवतेच्या ताम्हणात ठेवलेले चांदीचे टाक, त्या ताम्हणात खोबऱ्याची वाटी, भंडारा घेऊन ते ताम्हण घोंगडीवर ठेवले जाते. टोपी अथवा मुंडासे-फेटा घातलेले पुरुष तीन वेळा ताम्हण वरखाली करीत जयजयकार करतात -

**सदानंद यळकोट**
**भैरवनाथाचं चांगभलं**
**अंबाबाईचा उदो उदो**

हा उदोकार तीन वेळा झाल्यावर खोबऱ्याच्या वाटीचे तुकडे केले जातात. मग खोबऱ्याचे तुकडे व भंडारा घराबाहेर जाऊन उधळला जातो. त्याही वेळी जयजयकार होतो. नंतर पुन्हा असाच उदोकार होऊन प्रथम भंडारा, खोबरे पाच चांदीच्या टाकांवर वाहून त्याचा प्रसाद वाटला जातो.

**कोटंबा पूजन**

तळी भरल्यानंतर कोटंबा पूजन केले जाते. पितळेचा अथवा लाकडाचा कोटंबा हा पृथ्वीचे प्रतिक मानले जाते. हा कोटंबा वाघ्ये-मुरळ्या दानपात्र म्हणूनही वापरतात. पृथ्वी ही सृजनाची शक्ती आहे. या शक्तीची उपासना कोटंबा पूजनाच्या रूपाने होते. नैवेद्यपात्र किंवा भंडारपात्र म्हणून उपयोगात येणाऱ्या कोटंब्याची पूजा हा सुफलीकरणाचा विधी मानण्यात येतो. भंडारा वाहून, नैवेद्य दाखवून कोटंब्याची पूजा केली जाते.

**घटस्थापना**

कोटंबा पूजन झाल्यावर पाटावर लाल वस्त्र ठेवून त्यावर सव्वाशेर तांदूळ, सव्वाशेर गहू, भंडार पसरवून ३६० लिंगे प्रतिकात्मकरित्या काढली जातात. पाच नारळ, सव्वा किलो खोबरे, सात खारका, सात लेकुरवाळी हळकुंडे, सात फळे, सात सुपाऱ्या, सात बदाम असे पूजासाहित्य ठेवून नागवेलीच्या पानांवर देव्हाऱ्यातील चांदीचे पाच टाक ठेवले जातात व नागवेलीची ही पाने, गहू, तांदूळ भंडाऱ्याच्या गादीवर ठेवतात. नंतर दोन कलशात पाणी भरून त्या कलशांवर नागवेलीची पाच पाने ठेवून हे कलश गादीवर ठेवतात. त्यातील एक कलश खंडोबाचा व एक कलश अंबेचा असतो. शक्तीदेवतेच्या कलशावर वेणी चढविली जाते. कलशावरील पानांवर नारळ ठेवतात व या कलशांची गादीवर मांडणी झाली, की पाच ऊसांची तिकाटणी गादीवर लावतात. वारू (आसूड), कोटंबा, गाठा, लंगर, भंडारी या वस्तू घटासमोर ठेवून त्याची पूजा करतात.

**ओझं उतरणे**

पंचमी, चैती, आखाडी, बोहाडा आदी विधिनाट्यांमध्ये देवदेवतांची सोंगे काढली जातात. ही सोंगे घेणाऱ्या व्यक्ती साक्षात देवच असल्याची भावना जनमानसात असते. देवतेपुढे नवस करणे, नवस फेडणे, देवतेचे आशीर्वचन घेणे आदी श्रद्धा विधिनाट्यांच्या रूपाने जनमानसात रूजलेल्या असतात.

विधिनाट्य म्हणजे केवळ सोंग. या समाजापासून जागरण काहीसे वेगळे आहे, कारण जागरणात सोंगापेक्षा संकीर्तनावर अधिक भर असतो. याचा अर्थ जागरणात सोंग किंवा सोंगे नसतात असा होत नाही. पण हे सोंग किंवा सोंगे मुखवटे घालून होत नाहीत. जागरण सादर होताना वाघ्या हा खंडोबा, हेगडी प्रधान, नारद होतो अथवा मुरळी ही म्हाळसाबाई, बाणुबाई होतेय पण त्यासाठी मुखवट्यांचा वापर होत नाही. तर वाघ्या खंडोबाचा व हेगडी प्रधानाचा वेष करतो.

**भक्तगण**

कोळीसमाज, धनगर समाज, मांग समाज, रामोशी समाज, काही देशस्थ ब्रह्मवृंद समाज यांचे खंडोबा देव हे आराध्य दैवत असल्याचे आढळते. संत एकनाथांचे भारूडात वाघ्या मुरळीवर भारूडे रचल्याचे दिसून येते. राजा नळ व दमयंती हे खंडोबाचे भक्त होते.

रूप - अश्व व कुत्रा या खंडेरायाच्या परिवार परिसरात आढळतात.

खंडोबा हा एकमुख व चतुर्भुज आहे. तो अश्वारूढ आहे. हातात त्रिशूळ आहे. मस्तकावर भंडारा हळदीचा मळवट. गळ्यात कवड्याची माळ हे त्याचे रूप आहे.

कोल्हापूरात अशा वर्णनाची मूर्ती श्री महालक्ष्मी मंदिर येथे तर, बुधवार पेठेत खोलखंडोबा मंदिर आहे. रंकाळा परिसरात खंडोबा मंदिर आढळते.

**उत्सव**

सोमवती अमावस्या, चैत्र षष्ठी, श्रावण, माघी पौर्णिमा, चंपाषष्ठीचे वेळी या देव खंडोबाचा उत्सव करतात. महाराष्ट्रात हजारो ठिकाणी या देवाच्या उत्सवात यात्रा व जत्रा भरतात. उत्सव महोत्सव साजरे होतात. भंडारा उधळला जातो. भल्या बुऱ्या कामनांसाठी नवस बोलले व फेडले जातात. खंडेरायाच्या येळकोट जल्लोषात हा उत्सव लोक उत्सव ठरला आहे. अनेकांची ही उपास्य देवता आहे.

❖

## तुम्हीही लिहा!

एक प्रसंग, जो प्रत्येकाच्या आयुष्यात घडतो... आनंदी, गोड, कटू... असा, की जो विसरू म्हणता विसरता येत नाही...

तुमच्याही आयुष्यातही असा प्रसंग नक्कीच असेल... जो तुम्हाला इतरांना सांगावासा वाटेल. ही संधी आम्ही तुम्हाला देतोय...

मग, पाहताय काय कागद-पेन घ्या, लिहा आणि पाठवा..

**शब्दमर्यादा ३५०-४००**

# अच्छे दिन आले!

• **श्री. रमाकांत माधव विद्वांस** (पृ. ६२३), माटुंगा दूरध्वनी - २४३०५२६०

आपली पुण्याची कुलभागिनी कु. कस्तुरी माधव, पर्यटन व्यवसायात कार्यरत आहे. माझा सध्याच्या पासपोर्टची वैधता सप्टेंबरमध्ये संपत होती. त्याच्या नूतनीकरणासाठी लागणारे अर्ज कस्तुरीने दि. २५ मार्च २०१६ रोजी इंटरनेटवर भरले. नंतर इंटरनेटवरच जरूर त्या कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी लोअर परेल मुंबई स्थित पासपोर्ट सेवा केंद्र येथे मंगळवार दि. ५ एप्रिल २०१६ रोजी दुपारी २.४५ वाजता बोलावण्याचे पत्र मिळाले.

मी पासपोर्ट सेवा केंद्रात बरोबर दुपारी २.४५ वाजता पोचलो. प्रवेशद्वारावर बोलावण्याचे पत्र दाखवून मी त्या केंद्राच्या दालनात शिरलो आणि मला पहिला सुखद धक्का मिळाला. आतमध्ये गर्दी असूनही कलकलाट नव्हता. पहिल्या काउंटरवरच्या अधिकाऱ्याने माझ्याकडील कागद पाहून त्यातील बोलावण्याचे पत्र आणि सध्याचा पासपोर्ट आणि त्याची कॉपी एवढेच कागद बाहेर ठेवून बाकीचे पिशवीत परत ठेवण्यास सांगितले. त्याने मला सिरीयल नंबरचा कागद दिला आणि सांगितले की खुर्चीत बसून समोरच्या इलेक्ट्रॉनिक इंडिकेटर कडे लक्ष ठेवा. त्यावर तुमचा सिरीयल नंबर आणि काउंटर नंबर दिसल्यावर त्या काउंटरवर जा. एखाद्या मिनिटानंतरच A १० काउंटरवर माझा नंबर लागला. तिथे इलेक्ट्रॉनिक मशीनवर दहा बोटांचे ठसे आणि चेहऱ्याचा फोटो घेण्यात आला. एकदोन मिनिटातच काउंटर B च्या इलेक्ट्रॉनिक इंडिकेटर वर माझा नंबर लागला. काउंटर B वरचे काम ताबडतोब संपले. मी वेटिंगरूममधील खुर्चीवर बसत होतो तेवढयात काउंटर C वर माझा नंबर लागला. तिथे काम संपवून मी एक्झीट काउंटरवरून सर्व कागदपत्रे मिळाल्याची पावती घेऊन मी २५ मिनिटात म्हणजे दुपारचे ३.१०ला त्या केंद्राच्या बाहेर पडलो.

या केंद्रात एकदम अद्ययावत सोयी आहेत. इथे पूर्वीच्या खिडक्यावाल्या काउंटर्सच्या ऐवजी टेबले आहेत. प्रत्येक काउंटरवर सर्व व्यवहार कॉम्प्युटरच्या सहाय्याने चालतात. अधिकाऱ्याच्या समोरच्या बाजूस अभ्यागतांसाठी दोन खुर्च्या आहेत. सर्व अधिकारी हसतमुखाने अभ्यागतांशी अत्यंत सौजन्याने बोलतात. कुशल अधिकाऱ्यांच्यामुळे सर्वत्र काम पटापट होत होते. केंद्र चकाचक स्वच्छ ठेवलेले आहे. केंद्राच्या आतच कॉपी काढण्याची सोय आहे. दहा वर्षांपूर्वीचे पासपोर्ट सेवा केंद्र आणि आत्ताचे केंद्र यात तुलनाच नाही.

घरून निघाल्यापासून जवळजवळ एक तासात मी घरी परत आलो. आणखी एक आश्चर्याची गोष्ट म्हणजे घरी कॉंप्युटरवर ई-मेल मेसेज होते की आपण आज दुपारी ३.०२ वाजता पासपोर्ट केंद्रात आपल्या आधार कार्डाचा यशस्वी उपयोग केलात त्याबद्दल धन्यवाद. जर आपण स्वतः उपयोग केलेला नसे तर ताबडतोब आमच्याशी संपर्क साधा. याचा अर्थ असा की पासपोर्ट केंद्राने माझ्या बोटांचे ठसे व फोटो आणि मी आधार कार्डसाठी दिलेल्या माझ्या बोटांचे ठसे व फोटो हे सारखेच आहेत याची कॉंप्युटरवर खात्री करून घेतली असणार. हे खरे कॉंप्युटर युग. याचा अर्थ असाही होतो की एकाच माणसाला दोन आधार कार्ड्स काढणे बहुतेक शक्य होणार नाही.

हा मोदी इफेक्ट नाही का? जय मोदी सरकार ! जय भारत

❖

## वाचकांचा पत्रव्यवहार

श्री

दि. २-४-१६

प्रति,

डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे

यांसी सप्रेम नमस्कार विशेष,

हितगुजचा मार्चचा अंक मिळाला. तेथील सर्वांची दखल पण घेतली गेली. सांगली हे माझे आजोळ घर असल्याने व मराठे कुलबांधवांचे संमेलन तेथे ठरल्याने खूप बरे वाटले आम्ही सर्वांनी येण्याचे ठरविले. त्याप्रमाणे आम्ही तीन पिढ्या तेथे उपस्थित होतो. चि. श्रीपाद जनार्दन मराठे, पिंपळकर व नातू अजिंक्य श्रीपाद मराटे नात चि. संजना श्रीपाद मराठे व सूनबाई सौ. निधि श्रीपाद मराठे व माझी धाकटी बहीण सौ अलका थत्ते असे आठ जण आलो होतो. सांगलीकरांनी व्यवस्था खूपच छान ठेवली होती. व खूपच मजा आली आम्ही मात्र तेथे न थांबता माझा मामा श्री रामचंद्र वेलणकर व मावशी श्री फडके यांचे कडे थांबलो होतो. नंतर आम्ही कोकणदर्शन करत भोपाळला परत आलो.


आपली

**श्रीमती निर्मला जनार्दन मराठे**

भोपाळ (मप्र)

# लोभस व्यक्तिमत्त्व - डॉ. भालचंद्र सखाराम मराठे

• **शब्दांकन :- सुरेश गोविंद मराठे** (पृ. ५०३), डोंबिवली भ्रमणध्वनी - ९८७००१७१५०



आपल्याच गावात राहुन लोकसेवा करायची या हेतुने डॉ. भालचंद्र मराठे यांनी मुटाट येथेच वैद्यकीय व्यवसाय करण्याचा निर्णय घेतला. मुटाट (तालुका देवगड, जिल्हा सिंधुदुर्ग) हे खेडेगाव. वाहतुकीच्या फारशा सोयी नाहीत तरीही अकोला येथे वैद्यकीय शिक्षण घेऊन २-३ वर्षे अन्य हॉस्पिटलमध्ये अनुभव घेऊन मुटाट येथेच व्यवसाय सुरू केला. ही साधारणपणे ५० वर्षापूर्वीची गोष्ट आहे. साधारण १९६३-६४ चे सुमारास या व्यवसायाला सुरुवात झाली व त्यावेळी मुटाट तसेच आजूबाजूच्या गावांत वैद्यकिय सेवा उपलब्ध नव्हती. डॉ. भालचंद्र मराठे यांच्या वैद्यकीय सेवेमुळे खुपच सोय झाली. अर्थात हे सोपे नव्हते कारण वाहतुकीच्या साधनांचा अभाव हळुहळु व्यवसायात जम बसल्यावर त्यांनी स्वतःचे हॉस्पिटल सुरू केले व लोकांची आणि विशेषतः स्त्रियांची सोय झाली. डॉक्टरांचा स्वभाव अत्यंत मृदु व समोरच्या माणसाला विश्वास दिलासा देणारा व त्यामुळे निम्मा आजार औषधा अगोदरच बरा होई. या व्यवसायांत त्यांच्या पत्नी सौ. स्नेहलता वहिनी यांची साथ खुपच महत्त्वाची स्वतः स्त्रीरोग तज्ज्ञ. सोलापूरसारख्या जिल्ह्याच्या ठिकाणी M.B.B.S. - D.G.O. पर्यंत शिक्षण घेऊन मुटाट सारख्या छोट्या गावात येणे हे कौतुकास्पदच. रात्री बेरात्री आजारी व्यक्तिला पाहण्याकरीता पायपीट करत जावे लागे. या हॉस्पिटलमुळे हे थोडे कमी झाले पण काहीवेळा जावे लागेच व यासाठी स्वतःचे वाहन असणे गरजेचे त्यामुळे अनेक गांवामध्ये जाण्याची सोय होऊ शकली मुटाटहुन विजदुर्ग पर्यंत (सुमारे ३० किलोमीटर) तसेच मुंबई गोवा मार्गावरचे तळेरे गावांपर्यंत जाणे सोईचे झाले. मात्र स्वतःचे वाहन येईपर्यंत १०-१२ किलोमीटर चालत जावे लागे. अगदी रात्री अपरात्री सुद्धा. नदीपलीकडच्या गावांसाठी एका लाँचची व्यवस्था करावी लागली. त्यांच्या या सेवेचा अनेकांना फायदा झाला.

कालांतराने पडेल येथे दवाखान्यासाठी स्वतंत्र व्यवस्था केली त्यामुळे आजुबाजुच्या अनेक गांवातील लोकांची सोय झाली. अजूनही हा दवाखाना सुरू आहे.

डॉक्टरांचा हा वारसा त्यांचे सुपुत्र डॉ. किरण मराठे पुढे चालवत आहेत देवगड येथे त्यांचे सुसज्ज हॉस्पिटल आहे.

डॉ. मराठे यांना त्यांच्या पत्नीची सौ. अर्चना मराठे यांची समर्थ साथ मिळाली आहे. (M.B.B.S. - D.G.O.) तिसरी पिढीही डॉ. कुणाल यांच्यामुळे या व्यवसायांत येईल. आजोबा-मुलगा-नातू यामुळे समाजसेवेचा वारसा पुढेही चालू राहिलच. डॉ. भालचंद्र मराठे यांचे दोन मुलगे हे पुण्यात 'माहिती तंत्रज्ञान' यात पारंगत असून पुणे मुक्कामी कार्यरत आहेत.

डॉ. मराठे यांनी या व्यवसायाबरोबरच बाग कामाचीही आवड जोपासली आहे. हापुस आंब्याच्या बागेच्या रूपाने पाहाताक्षणीच दिलासा वाटावा असे डॉ. मराठे वयाच्या पंच्याहत्तरी नंतरही सतत कार्यरत आहेतच. मुटाट गावात आता ४-५ डॉक्टर आहेत व त्यांना डॉ. मराठे यांचे मार्गदर्शन आहेच. अशा डॉ. भालचंद्र मराठे यांना दीर्घायुरोग्य मिळो व त्यांच्याकडून अशीच समाजसेवा घडो हीच शुभेच्छा.

**डॉ. भालचंद्र सखाराम मराठे B.A.M.S.**

डॉ. भालचंद्र यांचा जन्म मुटाट ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग येथे झाला. जन्म दि. १०-१२-१९३८. प्राथमिक शिक्षण मुटाट येथे झाले. माध्यमिक मिठबांव येथे शिरोडकर हायस्कूल येथे झाले. त्यानंतर त्यांच्या मामांच्या व ज्येष्ठ बंधुंच्या सल्ल्याने अकोला येथे बीएएमएस शिकून पास झाले. नंतर निरनिराळ्या हॉस्पिटलमधून वैद्यकीय माहिती अनुभवासाठी घेतली. त्यांच्या पत्नी सौ. स्नेहलता या एमबीबीएस-डीजीओ शिकलेल्या आहेत. त्यासुद्धा वैद्यकीय सेवा करीत होत्या. आता त्या व्यवसाय करीत नाहीत. त्यांचे मोठे चिरंजीव डॉ. किरण एमडी(??) होऊन त्यांनी देवगड येथे स्वतःचे हॉस्पिटल बांधले आहे. डॉ. किरण सुवर्ण पदक विजेते आहेत. डॉ. किरण यांचे ज्येष्ठ चिरंजीव कुणाल हे मुंबई येथे एमबीबीएस चे शिक्षण घेत आहेत.

डॉक्टरांचे दोन नंबर व तीन नंबरचे चिरंजीव पुणे येथे कॉम्प्यूटर इंजिनिअर म्हणून सर्व्हिस करतात. डॉक्टर ज्या वेळेला अकोला येथे शिक्षणासाठी गेले त्यावेळी मुटाट येथे वैद्यकीय सोय नव्हती डॉ. बोडस आरएमपी हे प्रॅक्टीस करीत होते. ते सुद्धा वयोवृद्ध झाले होते. म्हणून मुटाट व परिसराची सोय व्हावी. म्हणून त्यांनी वैद्यकीय शिक्षण घेतले. आजुबाजुच्या खेड्यात सुद्धा फक्त वाडे येथे डॉ. नेने यांचा दवाखाना होता आता मुटाट येथेच ५-६ डॉक्टर्स झाले आहेत ते डॉ. लेले हायस्कूलचे विद्यार्थीच आहेत.

डॉ. लेले हायस्कूलच्या विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी ते विनापैस करतात. त्यांची ख्याती विजयदुर्ग ते तरळे, खारेपाटण व राजापूर तालुक्यांतील बरेच पेशंट घेतात. सर्प विषबाधेचे निष्णात डॉक्टर म्हणून ओळखले जातात.

१९६२-६३ मध्ये मुटाट येथे प्रॅक्टीस करण्यास आले. त्यावेळी बऱ्याच गांवातून मोटारीचे रस्ते नसल्याने १९-१९ किलोमीटरपर्यंत चालत जात असत. नंतर गाडी रस्ते होऊ लागले.

खाडीतून जाताना पाण्यातून जाण्यासाठी स्वतः मोटारलॉंच घेतली व त्याचे ड्रायव्हर बुद्ध समाजातील ठेवलेला होता आता रस्ते झाल्याने बऱ्याच ठिकाणी गाडी जाऊ शकते.

रात्री अपरात्री केव्हांही पेशंट आले तरी तपाशित असत. फीसुद्धा माफक असे. कामाची आवड असून ४०० ते ९०० कलमांची बाग केली आहे. आता ७८ वय झाले तरी ते कार्यरत आहेत. पडेल कँटीन येथे दवाखान्याची स्वतंत्र इमारत बांधली आहे. ठराविक वार तेथे ठेवलेले आहेत. तेथे येऊन त्यांच्या स्नुषा सौ. अर्चना या सोनोग्राफी वगैरे करतात. त्यासुद्धा एमबीबीएस-डीजीओ शिकलेल्या असून पूर्ण वेळ हॉस्पिटलमध्ये कार्यरत असतात. ◆

# नांदा सौख्यभरे



पं. राम मराठे यांची नात विख्यात गायिका आणि अभिनेत्री कु. स्वरांगी (मुकुंद मराठे, सौ. केतकी मराठे यांची सुकन्या) हिचा विवाह नुकताच फ्रेबुवारी २०१६ मधे चि. निखिल (श्री. शिरीष काळे व सौ. वर्षा काळे, ठाणे यांचे सुपुत्र) याजबरोबर अत्यंत साधेपणाने पण शास्त्रोक्त संपन्न झाला.

विवाहाच्या थाटामाटाचा खर्च न करता त्यांनी वनवासी कल्याण आश्रम व सांगितिक संस्थेला आर्थिक भरघोस देणगी दान दिली. एक प्रकारच्या सामाजिक बांधिलकीचा आदर्श या वधू-वरांनी समाजासमोर ठेवला आहे. त्यांचे हे कार्य निश्चितच अभिमानास्पद आणि अनुकरणीय आहे. आशा आहे की आपल्या परिवारातील नवविवाहीत वधू-वर, स्वरांगी आणि निखिल यांच्या या स्वार्थरहीत, आदर्श कृतीतून प्रेरणा घेतील आणि त्याप्रमाणे वागतील अर्थात त्यांना त्यांच्या वडीलधाऱ्या कुटुंबियांकडून पाठिंबा हवाच. केवळ नोंदणी पद्धतीने लग्न केले म्हणजे झाले असे नव्हे तर समाजोपयोगी, राष्ट्रासाठी द्रव्यरूपाने देणगी दान म्हणून देणे हे महत्त्वाचे कार्य आहे.

चि.सौ. कां. स्वरांगी आणि चि. शिरीष या नवदाम्पत्याला सुखी-समृद्ध वैवाहीक आयुष्यासाठी खूप खूप शुभेच्छा आणि शुभाशिर्वाद. नांदा सौख्यभरे!

**– संपर्कासाठी दूरध्वनी –**

श्री. मुकुंद मराठे (पृ. ३६८) ९८९२३१५७३१

सौ. केतकी मराठे ९९६७७०१९६०

# मैत्रिण सापडली...

प्रिय. सौ सुमेधाताई,
सप्रेम नमस्कार,
त्याचं असं झालं की,

काल मला भांडूपच्या माझ्या मुलीचा फोन आला की, ''आई, तुझी मैत्रिण कोणी मंगला रानडे म्हणून सांगलीला होता कां? मी म्हणाले हो. ती आमच्या घरासमोरच राहायची. आमच्या शाळेत होती. मी मंगला पाटणकर व ती मंगला रानडे. ४० वर्ष झाली या गोष्टीला. पण तुला कशी माहिती? मुलगी म्हणाली, ''काल तिचा फोन आला होता. फोन हुबळीहून उमा मराठे यांचा आला होता. म्हणजेच मंगला रानडे ह्या विवाहानंतर सौ. उमा मराठे होत्या. मुलगी म्हणाली, मी त्यांचा फोन क्रमांक घेतला आहे. त्यावर तू फोन कर.

मी मंगलाला फोन केला. हुबळीला त्यांचेकडे आपले हितगुज जाते. हितगुजमध्ये माझ्या विवाहाला पन्नास वर्षे पूर्ण झाली म्हणून फोटोसहीत माहिती मुलगी सौ. निलिमा कोलटकर हिने दिली होती. व फोन क्रमांकही दिला होता. तो मजकूर मंगला हिने वाचला. तिला माझे लग्नानंतरचे नांव 'चक्रदेव' झाले आहे, हे माहित होते. त्यामुळे मी तिला फोन केल्यावर सर्व माहित झाले. आम्ही एकमेकींशी ४० वर्षांच्या साचलेल्या गप्पा मारल्या.

हे केवळ आणि केवळ 'हितगुज'मुळे आम्ही एकमेकींशी गप्पा मारू शकलो.

धन्यवाद सुमेधाताई तुम्हांला आणि हितगुजला

आपली

**सौ. शालिनी अच्युत चक्रदेव** (पृ. ७३२)
चिंचवड, पुणे ३३
भ्रमणध्वनी ९६२३५५०६३३

• चंदेरी दुनिया •

# ''लाखो हैं यहाँ चाहनेवाले' - महेंद्र कपूर

• श्री. सुधाकर दत्तात्रय मराठे

भ्रमणध्वनी - ९८२२३२९७७०



१५ ऑगस्ट किंवा २६ जानेवारी सारख्या राष्ट्रीय सणांच्या दिवशी खरं तर सुट्टीचा मूड असतो. कर्तव्य म्हणून का होईना, पण सकाळीच ध्वजवंदनासाठी सरकारी कचेऱ्या आणि शाळांमधून लगबग चालू असते. अशाच वेळी रस्त्यांवरून जाताना चौकाचौकातून देशभक्तिपर गाण्यांचा मारा होत असतो आणि कुठंतरी, क्षणभरासाठी का होईना, आपले मन देशभक्तिच्या भावनांनी उचंबळून येते. कारण पहाडी आणि टिपेच्या आवाजात 'मेरे देश की धरती सोना उगले (चित्रपट - उपकार - संगीत कल्याणजी आनंदजी) किंवा भारत का रहनेवाला हूँ (पूरब और पश्चिम - कल्याणजी आनंदजी) सारखी गाणी सुरूरू असतात. अर्थातच, ही गाणी अजरामर करणारा गायक म्हणजेच महेंद्र कपूर.

बऱ्याचदा प्रति रफी म्हणून गणला गेलेला, पण रफी उपलब्ध नसेल तरच त्याचा उपयोग केला गेलेला किंवा काही संगीतकारांचा नाइलाज म्हणून ज्यांच्याकडून गाणी गाऊन घेतली जात - असा चित्रपटसृष्टीतील त्या मानाने दुर्लक्षितच राहिलेला गायक म्हणजे - महेंद्र कपूर.

आई शांतादेवी आणि थोरले बंधू ब्रिजमोहन या दोघांनाही संगीताचे अंग होते. त्यामुळे संगीतमय वातावरणातच बालपण घालवलं होतं. असे ९ जानेवारी १९३४ रोजी अमृतसर येथे जन्म झालेले गायक म्हणजेच 'महेंद्र कपूर'

वडील कापड व्यावसायिक पण स्वतःच्या व्यवसायात त्यांना न आणता 'महेंद्र कपूर'ला त्यांच्या वडिलांनी शिक्षकांच्या सांगण्यावरून संगीत शिक्षण देण्याचा निर्णय घेतला आणि आकाशवाणी कलाकार मनोहर पोतदार, पं. जगन्नाथबुवा तसेच उस्ताद नियाज अहमद खान आणि संगीतकार हुस्नलाल यांच्याकडे त्याने संगीताचे धडे गिरविले.

महंमद रफीचे चाहते म्हणूनच महेंद्र कपूर त्यांना भेटण्यास गेले होते. त्या वेळी रफींनी काही काळ दुर्लक्षच केले; पण त्यांचे गाण्यावरील प्रेम आणि निष्ठा पाहून रफी त्यांना स्वतःबरोबर रेकॉर्डिंगसाठी बरोबर नेऊ लागले आणि त्यातूनच 'खय्याम' सारख्या संगीतकाराबरोबर महेंद्र कपूरची जवळीक वाढली आणि त्यांचाच 'हिर' नावाच्या पंजाबी चित्रपटात त्यांना गाण्याची संधी मिळाली; पण या गाण्याचा मोबदला मात्र त्यांना फारच उशिरा मिळाला. हीच बाब पुढे त्यांच्या पथ्यावर पडली आणि महेंद्र कपूरसारखा एक दमदार गायक चित्रपटसृष्टीला लाभला.

नवे गायक शोधण्यासाठी १९५७ मध्ये अखिल भारतीय रेडिओ-मर्फी गायक स्पर्धा आयोजण्यात आली होती. खरं तर या स्पर्धेत त्यांनी स्वतःहून भाग घेण्याचे टाळले होते; पण त्यांना स्पर्धेसाठी बोलावणे आले. कारण त्यांचा मित्र सुरेंद्र कपूरने त्यांच्या नावाचा अर्ज पाठविला होता. तोही त्यांना न कळवताच.

या स्पर्धेचे सर्वच परीक्षक दिग्गज संगीतकारच होते. नौशाद, सी. रामचंद्र, वसंत देसाई आणि मदनमोहन व अनिल विश्वाससारखे.

या स्पर्धेतील सर्वच पायऱ्या महेंद्र कपूर जिंकत गेले आणि अंतिम फेरीत पोहोचले. पण याच वेळी त्यांच्यावर हे व्यावसायिक गायक आहेत, असा आक्षेप घेण्यात आला; पण कोणत्याही गाण्याचे 'मानधन' त्यांना मिळालेच नव्हते. 'हिर' चित्रपटातील गाण्याचाही संदर्भ देण्यात आला - अगदी कोर्टकचेऱ्याही झाल्या; पण या सर्व अडचणींवर मात करीत त्यांना अंतिम फेरीत गाण्याची संधी मिळाली व त्यात यश मिळताच स्वतः म. रफींनी त्यांची पाठ थोपटली होती.

स्पर्धेतील नियमाप्रमाणे सर्व परीक्षकांकडून त्यांना गाण्याची संधी मिळणार होती. तशी सर्वप्रथम संधी त्यांना 'नौशादजी'नी दिली. १९५८ मधील 'सोनी महिवाल' या चित्रपटातील 'मुझसे चाँद छिपा है... हुस्न चला है इश्क से मिलने, जुल्म की बदली छाई'... या गाण्याने त्यांचा आवाज प्रेक्षकापर्यंत पोहोचला. या चित्रपटातील केवळ हे एकच गाणे त्यांना मिळाले; पण गाणं गाजलं तरी चित्रपट फारसा चालला नाही.

नौशादजींनी संधी देण्याच्या आधीही महेंद्र कपूरने स्नेहल भाटकर (दिवाली की रात - १९५६), (फरियाद) यांनी संगीत दिलेली तसेच व्ही. बलसारा यांच्या दिग्दर्शनाखालीही चित्रपटात गाणी गायली होती; पण ती गाजली नाहीत, चित्रपटही चालले नाहीत आणि आज तर ती गाणी कोणाला आठवतही नसतील.

त्या काळातील अनेक प्रसिद्ध संगीतकारांनी महेंद्र कपूरकडून गाणी गाऊन घेतली. त्यांतली काही आजही ऐकली जातात; पण आपण नाइलाजानेच त्याचा आवाज वापरला, असेही काहींनी कबूल केले.

'खो गया है मेरा प्यार' (हरियाली और रास्ता), हर दिल जो प्यार करेगा (संगम), है आग हमारे (जिस देश में गंगा बहती है), मेरे सरकार मेरी आहों का असर देख लिया (शिकार) सर्व शंकर-जयकिशन, तसेच ठंडे ठंडे पानीसे नहाना चाहिये (पती, पत्नी और वो), फकीरा चल चला चल (फकिरा), रवींद्र जैन 'फूल बन जाऊंगा' (प्यार किये जा - लक्ष्मी-प्यारे), इत्यादी प्रसिद्ध गाण्याबरोबर त्यांनी वसंत देसाई, एस.एन. त्रिपाठी (अनेक पौराणिक चित्रपट), एस.डी. बर्मन, चित्रगुप्त (डोली), मदन-मोहन (अनपढ, जब याद किसी की आती है), आर.डी. बर्मन (दुनिया, मजदूर), सी. रामचंद्र (नवरंग, बहुरानी, जिंदगी और मौत) आदी संगीतकारांकडे जास्तीत जास्त प्रामाणिकपणे गाण्याचे काम त्यांनी केले. नवरंग (आधा है चंद्रमा, अरे जा रे नटखट, श्यामल श्यामल वरन) आणि दिल लगाकर हम ये समझे - जिंदगी और मौत) ही सी. रामचंद्र यांची गाणी आजही प्रसिद्ध आहेत.

खरं तर महेंद्र कपूरच्या आवाजाबद्दल अनेक मतप्रवाह असतील किंवा संगीतकार रवी, कल्याणजी आनंदजी, एन. दत्ता आदींना चित्रपटसृष्टीत दुय्यम संगीतकार समजले जात असेल; पण यांनीच महेंद्र कपूर तसेच कधी लता किंवा आशा यांना घेऊन काय अप्रतिम गाणी दिली आहेत. 'धडकने लगी दिल के तारों की दुनिया', 'झुकती घटा गाती हवा', 'तेरे प्यार का आसरा चाहता हूँ' (सर्व धूल का फूल - एन. दत्ता) 'मेरे देश की धरती (उपकार)', 'इक तारा बोले (यादगार)', 'हे रामचंद्र कहे गये सिया से (गोपी)', 'भारत का रहनेवाला हूँ (पूरब और पश्चिम)', 'जिसके सपने हमे रोज आते रहे (गीत)', 'दो बेचारे बिना सहारे (व्हिक्टोरिया नं. २०३)', 'नेकी तेरे साथ चलेगी बाबा (आसू और मुस्कान)' सर्व कल्याणजी-आनंदजी ही गाणी अनेक संगीत कार्यक्रमात आजही आवडीने गायली व ऐकली जातात.

महेंद्र कपूरची भट्टी उत्तमरीत्या जमली ती म्हणजे संगीतकार रवी, दिग्दर्शक यश चोप्रा आणि अभिनेता सुनील दत्तबरोबर. संगीतकार रवींनी दिलेली गाणी म्हणजे मस्त खुललेला महेंद्र कपूर. माझ्या आणि निर्मात्यांच्या 'बजेट'मध्ये बसणारा गायक म्हणूनच आम्ही महेंद्र कपूरला स्वीकारत असू' असे रवीने स्वतःच एका मुलाखतीत सांगितले होते.

'हमराज', 'गुमराह', 'वक्त', 'आदमी और इन्सान', 'भरोसा' इत्यादी अनेक चित्रपटांतील गाणी आठवली तरी मन एका वेगळ्याच भावनेने भरून जाते. 'एऽ नीले गगन तले धरती का प्यार पले', 'न मूँह छुपा के जियो', 'तुम अगर साथ देने का वादा करो' ही 'हमराज'मधील गाणी; तर 'गुमहार'मधील 'चलो इक बार फिरसे', 'आप आये तो खयाले', 'ये हवा ये फिजा' ही गाणी कायमच लक्षात राहण्यासारखीच आहेत.

द्वंद्वगीतातही 'आज की मुलाकात बस इतनी (भरोसा)', 'दिन है बहार के (वक्त)', तसेच 'धूल का फूल', 'वह कौन थी', 'नवरंग' इ. चित्रपटातील द्वंद्वगीतेही बहारदार आहेतच.

ओ.पी. नय्यरने तर महेंद्र कपूरला प्रति रफी बनविण्याचा चंगच बांधला होता. त्याने ही 'आँखों की तलाशी दे दे (दिल और मुहब्बत)', 'अंधरे में जो बैठे है (संबंध)', 'तुम्हाला चाहनेवाला खुदाकी दुनियामें (कही दिन कही रात)', 'फिर मिलोगे कभी (ये रात फिर न आयेंगी)', 'लाखों है यहाँ दिलवाले (किस्मत)' इत्यादी गाणी हेच सांगून जातात; परंतु 'मेरा प्यार वो है के मर कर भी तुमसे', हे 'यह रात फिर न आयेंगी' या चित्रपटातील गाण्याला मात्र रफीच योग्य न्याय देऊ शकला असता, हे ओ.पी.नी कबूलही केले होते.

हिंदीप्रमाणेच महेंद्र कपूरने अनेक मराठी, गुजराती, सिंधी, पंजाबी भाषांतही गाणी गायली आहेत.

मराठी चित्रपटसृष्टीत सुधीर फडके सोडून इतर अनेकांनी महेंद्र कपूरकडून गाणी गाऊन घेतली आहेत. 'मधुचंद्र'मधील 'हें चिंचेचे झाड दिसे मज', 'मधु इथे अन् चंद्र तिथे' ही गाणी अजूनही प्रसिद्ध आहेत, तर 'रात्रीस खेळ चाले (हा खेळ सावल्यांचा)', 'सूर तेच छेडिता (अपराध)' तसेच 'सांग कधी कळणार तुला', 'ती येते आणिक जाते', 'धुंदीत राहू, मस्तीत गाऊ' ही गाणीही विसरता येत नाहीत.

दादा कोंडकेंनी महेंद्र कपूरला मराठीमध्ये चांगली संधी दिली. 'अंजनीच्या सुता तुला रामाचे वरदान' किंवा 'गंगू तारुण्य तुझे बेफान' सारखी गाणी चांगली प्रसिद्ध आहेत. दादा कोंडकेंचा तो कौटुंबिक मित्र होता. मराठीतील 'च' किंवा 'ळ', 'ण' इत्यादी शब्द त्याने प्रयत्नपूर्वक आत्मसात केले होते. इतकेच नाही, तर मराठी गाण्याचा अर्थ, प्रसंगी ग्रामीण भाषा, द्वयर्थी शब्द तो मनापासून समजून घेत असे.

प्रसिद्ध टी.व्ही. मालिका 'महाभारत'चे शीर्षक गीत (१९८८) तसेच विष्णुपूराण (२००२); अनेक दोहे, मंत्र चोपाईया ही त्यांनी गायल्या आहेत.

महेंद्र कपूरला ३ वेळा सर्वोत्कृष्ट पार्श्वगायक म्हणून 'फिल्मफेअर' पारितोषिकाने गौरविण्यात आले आहे. १९६४ मध्ये 'गुमराह'मधील 'चलो एक बार फिरसे', १९६८ मध्ये 'निले गगन के तले (हमराज)', तर १९७५ 'और नहीं बस और नहीं (रोटी कपडा और मकान) साठी, तर सर्वोत्कृष्ट पार्श्वगायकाचे 'राष्ट्रीय पारितोषिक' 'मेरे देशे की धरती (उपकार - १९६८)' या गाण्यासाठी मिळाले आहे. मध्य प्रदेश सरकारचा लता मंगेशकर पुरस्कार आणि भारत सरकारचा पद्मश्री किताबही त्यांना प्राप्त झाला आहे.

तीन मुली आणि मुलगा रोहन कपूर हा महेंद्र कपूरचा वारसा. मुलाने 'लव्ह ८६', 'फैसला' वगैरे चित्रपटांत अभिनय केला व काही स्टेज शोही केले; पण त्याला यश मिळाले नाही. दि. २७ सप्टेंबर २००८ रोजी महेंद्र कपूरने मुंबईत शेवटचा श्वास घेतला.

महेंद्र कपूरच्या गाण्यांबद्दल अनेकांनी नाके मुरडली असतील; पण शेवटी कलाकार हा कलाकारच असतो. उमद्या स्वभावाचा, कधीही वादात न सापडलेला महेंद्र कपूर त्यांच्या अविट गाण्यांसह कायमच स्मरणात राहणार आहे.

म्हणून महेंद्र कपूरची गाणी ऐकताना 'बदल जाये अगर माली चमन होता नहीं खाली, बहारे फिर भी आती है, बहारे फिर भी आएगी', असेच म्हणावेसे वाटते.

**– श्री. सुधाकर दत्तात्रय मराठे**

फोन ०२०-२४२१०१९८/९८२२३२९७७०

**टीप :–** वरील लेखासाठी इसाक मुजावर यांच्या 'चित्रपट संगीताचा सुवर्णकाळ' (१८३१ ते १८६०) या पुस्तकाचा व सुरेशचंद्र जाधव यांच्या 'वो भूली दाँस्ता' या पुस्तकाचा संदर्भासाठी आधार घेण्यात आला आहे. मी त्यांचा आभारी आहे.

❖

# श्री. ह. मों. चें. नवीन पुस्तक

• **श्री. कालिदास बाळकृष्ण मराठे** (पृ. ५४१), गोवा भ्रमणध्वनी – ९४२३८८२२९०

१ मार्च २०१६ रोजी श्री. ह. मो. मराठे यांनी स्वतःच 'बाळकांड आणि पोहरा' समीक्षा आणि समांतर समीक्षा हे पुस्तक प्रसिद्ध केले.

२००१ साली प्रसिद्ध झालेले बाककाण्ड आणि २००७ साली प्रसिद्ध केलेले 'पोहरा' या दोन्ही पुस्तकाला लेखक वाचक यांचा भरघोस प्रतिसाद मिळाला वाचकांच्या पत्राला त्यांनी समांतर समीक्षा असे म्हटले आहे.

वर उल्लेखित पुस्तकात चार भागात त्यांनी समीक्षा लेख पुस्तक परीक्षण, साहित्यिकांची पत्रे आणि वाचकांची पत्रे दिली आहेत. ज्यानी बाळकांड पोहरा वाचले नसेल त्यांच्यासाठी दोन्ही पुस्तकाचा सारांश दिला आहे.

साहित्याच्या क्षेत्रातील या आगळ्या-वेगळ्या प्रयोगाचे स्वागतच करायला हवे.

बाळकांड आणि पोहरा या दोन्ही पुस्तकाना साहित्य अकादमी पुरस्कार अथवा महाराष्ट्र राज्य सरकारचा पुरस्कार मिळाला नाही.

परंतु लोकाश्रय भरपूर मिळाला ज्याचे प्रत्यंतर वरील पुस्तकात पानापानावर बघायला मिळते.

डॉ. नंदकुमार कामत यांनी नोबेल पारितोषिक मिळाल्याच्या योग्यतेचे पुस्तक तर सानेगुरुजींच्या 'श्यामच्या आई' नंतर आलेले श्रेष्ठ पुस्तक म्हणून देवकी वळवडे बाळकांडचा गौरव करतात. मराठीतील ज्येष्ठ लेखक श्री. गंगाधर गाडगीळ यांनी बाळकांड 'अनकॉमन' आहे असे म्हटले होते.

'ललित' मासिक दरवर्षी चोखंदळ वाचकांची निवड एप्रिलमध्ये जाहिर करते. २००१ व २००७ मध्ये बाळकांड आणि पोहरा या दोन्ही पुस्तकाना पहिला क्रमांक मिळाला होता. बाळकांड २०९ वाचकांपैकी ७० वाचकांनी पसंती दिली होती. जी आजपर्यंतचा विक्रम आहे.

आपल्या मराठ्यापैकी चार वाचकांची पत्रे या पुस्तकात प्रसिद्ध करण्यात आली आहेत (मात्र चार मध्ये) ज्यामध्ये श्री. ज.गो. मराठे, आगाशी, श्री. राजीव मराठे – इचलकरंजी, सौ, शौभा मराठे – अहमदनगर आणि माझा समावेश होता.

श्री. ह. मो. नी मनोगतात म्हटले आहे की 'बाळकांड' आणि 'पोहरा' ही दोन्ही पुस्तके साहित्यिक व सामाजिक दृष्ट्या अतिशय लोकप्रिय पुस्तके ठरली आहेत. त्यामुळे माझ्या मनात एक कल्पना आली आहे की बाळकांड + पोहरा + हे पुस्तक अशी तिन्ही एकत्र छापावी आणि त्यांचा एक महाग्रंथ प्रसिद्ध करावा. बघू या योग येतो कां!

'बाळकांड'ची पृष्ठसंख्या आहे ३३२ तर 'पोहरा' ची ५४४ आणि नव्या पुस्तकाची आहे ३६०. एकूण पृष्ठसंख्या होते १२३६. सध्याच्या तिन्ही पुस्तकांची किंमत होते रुपये ७६० (२०० +३६०+२००). परंतु आगावू नोंदणी केल्यास हा महाग्रंथ ५०० ते ५५० रुपयात देता येईल. आणि ह.मो. ची कल्पना आमच्यासारखे वाचक प्रत्यक्षात आणू शकतील. आपले मराठे या बाबतीत मागे राहणार नाहीत. आणि ह. मो. आमचे म्हणणारे सारे गोंयकर आणि कोकणचे बंधूभगिनी पण मागे राहणार नाहीत याची खात्री वाटते (कृपया संपर्क करा ९४२३८८२२९० वर)

यानिमित्ताने ज्यानी बाळकांड, पोहरा वाचले नसेल त्यांनी हे नवे पुस्तक आदी वाचावे आणि पत्र बाळकांड की पोहरा वाचावे अशी विनंती करतो आणि ह.मो हे पुस्तक प्रसिद्ध केल्याबद्दल अभिनंदन करतो व या पुस्तकाचा तिसरा भाग लवकरच प्रसिद्ध करावा अशी वाचकातर्फे जाहिर विनंती करून थांबतो.

❖

# My Vacational Trip to America

• कु. मैत्रेय मंदार मराठे (पृ. २७७)

This year I and my grandmother went to America to my aunties house to live for a month. We left our house at 9.30 p.m., reached the airport and did all our check in. finally we reached the plane and took our seats. The name of our plane was Air India Boeing 777. The plane should have started off at 11.00 but it was delayed to 12.00 because of some technical problem in the plane. It was a very long journey which took 17 hours to reach America. In America we reached new Jersey Air¬port. From there we look our luggage and met auntie. Just after we reached the car she brought to pick me up my uncle gave me a big basket full of chocolates and wel-comed me because I had came to America the first time. We took 2.30 to 3 hours to reach Maryland state. We crossed 2 states called New Jersey and Delaware. When we reached her society, there were many bungalows. I liked the place when we reached there. When we reached inside auntie's locked house, my cousin was sleeping. I quickly took a bath and woke him up telling him that LeBron James's match was starting. We both ran to the hall and had two cokes as one for him, one for me. After the one hour match my aunt gave us very delicious pave Bhaji. I enjoyed it. For some days we stayed at home. Then she took us to places she wanted us to visit. First we went to the Niagara falls which in Canada. We also got a look of Niagara River. It was told that there are some lakes and their water flows to the Niagara Falls. Lake Superior and Lake Michigan water flows to lake Huron and then to Lake Eerie. Its water then flows to the Niagara Falls. Niagara Falls is the 2nd largest fall in the world.

Its fall is equal to its length. Then we went to horse¬shoe fall. It's shape is like a foot print of a house. We clicked many photos of both the falls. Then we went to New York. We went up the Empire state building. It has 102 floors. From there we saw the Freedom Tower. Formerly, in place of the Freedom Tower there were two same looking towers called World Trade Center Twin Towers. A terrorist named Osama bin Laden's men crashed two planes in the twin towers. Many people died. They have built a memorial in the place of the twin towers and built the Freedom Tower which is taller than Empire state and is 1,776 feet tall. From there, you can see Empire State Building on the left. We ate food in a restaurant. Then we took a ferry in the Atlantic ocean. I was very excited to see the Statue of Liberty. As soon as we reached the Liberty Island, we were given head phone get information about Statue of Liberty. It is said that State of Liberty is tall as a 305 feet,. The statue is made of copper and due to ageing it has become green. After some days we went to a National Park. As soon as we reached there we went for a trail in the hill when we reached on the top of hill I was very tired. When we were coming down I wasn't tired. When we reached our room in the hotel, we ate our lunch and had a short nap. The next days we went to ocean city. There we ate a meal full of sea food. We also did a short walk. We reached our home late at night.

Then we went to Aero Space Museum. There I saw many planes. Then I saw white house. It was very big. Auntie also did some shopping in Washington. She bought 2 toys for me. Then we went to a zoo and there we saw many animals like king cobra, copperhead, chameleon, Alligator, crocodile and Panda. At the end of the month we reached. the airport where we reached the airplane. In between my grand¬mother told me to see the cockpit. I was very happy to see the cockpit. I enjoyed my trip to America very much.

❖

# संसर्गजन्य रोग (Imfectious Diseases)

• **डॉ. सीमा शाम मराठे** (पृ. ४११), पुणे दूरध्वनी - ०२२-२५२८०३०९

निरामय जीवन जगावं अशी प्रत्येक जीवाची इच्छा असते. परंतु आपल्या शरीरावर सातत्याने आघात होत असतात. मुख्यत्वे हवेतील प्रदूषणामुळे. धूर, धूळ व जंत, विषाणू ही प्रमुख कारणे आहेत. जंतूंपैकी सूक्ष्मतम विषाणू (Virus), बॅक्टेरिया याबद्दल खूप प्रगत संशोधन झालेले आहे. विविध जंतूंची (Microorganisms) नव्याने माहिती झाली आहे. त्यामुळे रोगाचा प्रतिबंध करणे किंवा रोग झाल्यास त्यावर उपचार करणे बऱ्याच प्रमाणात शक्य झाले आहे. प्रदूषण व जंतूंपासून झालेल्या रोगांचे गांभीर्य अधिक आहे आणि ते घेणे गरजेचे आहे.

Prevention is better than cureve.

स्वस्थस्य स्वास्थ्य रक्षणम् आतुरस्य व्याधी परिमोक्षः।

वरील दोन्ही वाक्यांचे अर्थ एकच आहेत हे आपण जाणता. रोग न होवून देणे जमल्यास चांगलेच. रोग झाल्यास योग्य उपचार करावेत.

मी श्वसनाच्या विकारांबद्दल माहिती देणार आहे. कारण प्रदूषण व जंतूंपासून श्वसनसंस्था सर्वप्रथम व सर्वाधिक बाधीक होणारी आहे. (Respiratary Systeme) प्राथमिकतः श्वसनाद्वारे हवेशीच शरीराचा अधिक संपर्क होतो.

श्वसनसंस्थेचे सोयीकरीतां दोन भाग केले आहेत. एक वरील भाग - जो नाकापासून गळ्यावरील मध्यभागी असलेले हाताला सहज समजणारे असे कार्टिलेज. (Cricoid Cartilage) व दुसरा त्या खालील भाग - श्वासनलिका, त्याचे दोन भाग (Bronchi) व त्यांच्या लहान फांद्या, फुप्फुसे हे अवयव आहेत श्वसन संस्थेच्या वरील भागात इन्फेक्शन झाल्यास ते औषधाने बरे करता येते. वेळेवर उपचार न केल्यास किंवा सातत्याने जर रोग झाल्यास तो खाली फुफ्फुसापर्यंत पोहोचतो.

**सर्दी किंवा पडसे (common cold, Rhinifis) -**

सर्दीसारखं दुखणं नाही अन् सर्दीने कोणी मरत नाही अशी एक म्हण आहे. अतिशय अस्वस्थ करणारं व त्रासदायक दुखणं म्हणजे सर्दी. विषाणू नाकावाटे आत शिरतात. नाकातील आतील भाग व घशातील वरील भाग (Nasopharynx) हा विविध तऱ्हेच्या विषाणूंमुळे बाधीत होतो. जर सर्दी अधिक दिवस टिकून राहिली किंवा वारंवार झाली तर नंतर बॅक्टेरिअल इन्फेक्शन होते (विशेषतः Streptocoai) ह्याला सेकंडरी इन्फेक्शन असे म्हणतात. हे इन्फेक्शन सर्वसाधारणपणे गर्दीच्या ठिकाणी अशुद्ध हवेमुळे, इतर रोगांशी संबंध आल्यास हवेमधील बाष्प व तापमानातील बदल व इतर दुखण्यांमुळे शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती कमी झाली असल्यास होते. या कारणांशिवाय ॲलर्जी हे ही महत्त्वाचे कारण आहे. यास Rhinifis असे म्हणतात.

लक्षणे : सर्दीची लक्षणे सहसा एकाएकी दिसतात. नाकातील मेंब्रेनला सूज येते, शिंका येतात, सुरुवातीला घसा कोरडा पडतो व अधिक तहान लागते, डोके जड होते किंवा दुखते, डोळे लाल होतात, डोळे व नाकातून पाणी वाहू लागते. अतिशय अस्वस्थ वाटते. अशी सर्दी विषाणूंपासून (Virus) झालेली असल्यास तीन चार दिवसात इन्फेक्शन होवून घसा प्रथमतः बाधीत होतो. खोकला, ताप येतो, वेळेवर डॉक्टरांकडे जाऊन औषध घेणे गरजेचे ठरते.

कॉम्लीकेशन्स : सर्दी हा जरी साधा आजार समजला जात असला तरी त्यातून काही गंभीर दुखणी उद्भवू शकतात. वेळेवर उपचार न मिळणे, सातत्याने पुन्हा पुन्हा सर्दी होणे, व्हायरस व जंतूंच्या संपर्कात येणे, व शरीराची रोगप्रतिकारक शक्ती कमी होणे ही प्रामुख्याने कारणे आहेत.

**१) सायन्यूसायटीस -** नाकाच्या वरील व बाजूच्या हाडांच्या पोकळीत विषाणू व जंतूंचा शिरकाव होतो यालाच सायन्यूसायटीस म्हणतात. यामध्ये तीव्र स्वरूपाचे डोके दुखणे, अतिशय अस्वस्थता, सायनसेसच्या जवळ हात लावल्यास दुखणे, उलटी होणे, चक्कर येणे, मंद ताप येणे ही लक्षणे असतात. पुढे सर्दी झाल्यानंतर सायन्यूसाटीस होणे ही एक सवय होवून जाते. ॲलर्जी हेही प्रामुख्याने कारण असू शकते.

**२) युस्टॅशियन कॅटेरा (Eustachian Catarrch) -** विषाणू व जंतू घशातून कानाकडे जाणाऱ्या नलिकेत जातात. यामुळे कानाचा गंभीर प्रकारचा आजार होवू शकतो. कान दुखणे, ऐकू कमी येणे, ताप येणे, डोके दुखणे, कानातून पाणी वगैरे लक्षणे असतात.

**३) ओटायटीस मिडिया (Otitis Media) -** कानाच्या तीन भागांपैकी मधल्या भागात इन्फेक्शन.

श्वसन संस्थेच्या खालील भागात इन्फेक्शन पसरणे - श्वासनलिका, ब्रॉन्काय, फुप्फुसे, ट्रॅकियायटीस, ब्रॉन्काटीस, न्यूमोनिया वगैरे.

उपचार : मुख्यतः विषाणूंमुळे सुरुवातीला सर्दी होते. विषाणूंचा नाश होण्याकरीता कोणताही उपाय नाही. ही सर्दी ३-४ दिवसांनी आपोआप बरी होते. मात्र लक्षणांकरीता व शरीराला मदत म्हणून काही उपचार केले जातात.

१) नाकात घालण्याचे ड्रॉप्स - नाकातील सूज कमी होवून चोंदलेले नाक मोकळे होते.
२) मेंथॉल, बेंसॉईन, कापूर, निलगिरी तेल हुंगणे किंवा पाण्यात घालून वाफ घेणे.
३) डोके दुखत असल्यास पेनकिलर आवश्यक आहे. पॅरॅसेटॅमॉल, डायक्लोफेनॅक गोळ्या गरजेनुसार घ्याव्या.
४) सेकंडरी इन्फेक्शन होवू नये म्हणून माईल्ड ॲन्टीबायोटिक डॉक्टरांच्या सल्यानुसार घेण्यास हरकत नाही.
५) डोळे लाल होवून पाणी येत असल्यास सोफ्राकॉर्ट व इतर ड्रॉप्स डोळ्यात नियमाने घालावेत.
६) ॲलर्जीमुळे सर्दी झाली असल्यास स्वतःला कोणत्या पदार्थाची ॲलर्जी आहे हे शोधून काढावे व त्या द्रव्यापासून आपला बचाव करावा.

❖

# नवरा

• **सौ. साधना सुधाकर मराठे** (पृ. ५७), अलिबाग
भ्रमणध्वनी - ७०६६३६९४३९



नवरा म्हणजे नवरा असतो
कधी प्रियकराच्या कधी मित्राच्या भूमिकेत तो
जगत असतो
तो जेव्हा घरात असतो तेव्हा घर
भरल्यासारखं वाटतं
पण तो जेव्हा घरापासून लांब जातो
तेव्हा घर उदास रहातं
त्याचा आधार म्हणजे वटवृक्षाच्या छायेत
विसावल्याचा आनंद मिळतो
तो कधी रुसतो कधी रागावतो पण ते
क्षणिक टिकणारं भांडण असतं
संसाराच्या आर्थिक व्यवहारांत वावरतांना
तो अलिप्त रहातो
बायको सारं बघेल म्हणून बिनधास्तपणे
जगत असतो
घरी पाहुणे रावळे येवोत. त्याची त्याला
फिकीर नसते
अतिथी देवोभव म्हणून बायको त्यांचा
आदर राखते
एक मात्र नक्की असत पाहूण्याच्या
सत्कार समारंभासाठी खिसा त्याचा मोकळा ठेवतो
कधी कधी पुरुषी अहंकाराचा
फणा वर काढतो
तेव्हाच नवरेशाहीचा हुकुमशहा
डोक वर काढतो
नवरा बायकोच्या ट्युनिंगमध्ये जुळणं आणि जूळवून
घेणं तसं फार अवघड असत
डोंबाऱ्याच्या खेळातील कसरतीप्रमाणे
तोल सांभाळत हासतमुखाने जगायचं असत
पण एकदा का तोल सांभाळणं जमलं
की सार काही सोप्प होतं
प्रितीच्या रेशीम गाठीचा गोंफ बघता बघता
विणला जातो
काही कालांतराने नवरा म्हणून तो
तटस्थ राहतो
बाप लेकांच्या कडू गोड नात्यात बायकोनी
मध्यस्थ म्हणून राहयचं असत
संसाराच्या रहाटगाड्यांत दोघानाही
फिरायचं असतं
इतरांकडून अपेक्षाच ओझ वर्षागणिक
वाढतच असतं
जीवनाच्या अंतिम क्षणापर्यंत
दमले म्हणून म्हणायचं नसतं
वृद्धत्वाच्या कालपर्वात एकमेकांना
सांभाळायचं असतं
हातातला हात सुटेपर्यंत असोशिने
जीवा शिवाय नात जपायचं असत
हात जर सुटलाच तर दुःखी कष्टी
व्हायचं नसतं
तिच्या किंवा त्याच्या मधुर आठवणीत
स्वःताला गुंतुन ठेवायचं असतं

❖

**व्हॉट्स अप!**

**पत्नी :** हे बघा, तुम्ही दरवेळी माझ्या माहेरच्यांना बोलू नका. जे बोलायचंय ते मला डायरेक्ट बोला!

**पती :** हे बघ, टीव्ही खराब झाला तर आपण टीव्हीला नाही बोलत. कंपनीच्या नावानेच बोंबलतो ना!

**व्हॉट्स अप!**

# नवजीवनाकरीता मृत्यु अटळ, मग त्याची भिती का असावी?

• **सदाशिव बळवंत मराठे** (पृ. ३८०), बडोदरा दूरध्वनी - ०२६५-२४२३०५५/२४२०६१८

कुणालाही मरण्याची ईच्छा असू शकत नाही. मरणानंतर स्वर्गात जागा मिळण्याची अपेक्षा असणाराही तो मृत्यु टळावा म्हणून प्रयत्न करीत असतो. आपल्या जीवनाचा शेवट मृत्यूनेच होणार आहे हे ठाऊक असतानाही माणूस त्या पासून सटकण्याचा प्रयत्न अनेक प्रकारे करतो. पण मृत्युनेच नवजीवन मिळणार आहे आणि मृत्युच नव्या जीवनाचा प्रतिनिधी-एजंट-साधन आहे व तोच जुने टाकून नवजीवन देतो हेच तर सत्य आहे.

वरील पहिला परिच्छेद वाचल्यावर लेखकाला आणखी काय नवीन सांगायचे आहे असं तुम्हाला वाटल्यास त्यात काही आश्चर्य वाटण्यासारखे नाही, परंतु लेखाचा निष्कर्ष सुरुवातीलाच वाचला तरी लेख संपूर्ण वाचल्याशिवाय त्याचा गुढार्थ वाचकाला कसा समजेल?

आपला समाज सर्वात जास्त दिखावा मृत्यु समयीच करतो. व्यक्ति मृत्यु पावल्यावर सर्वात जास्त आघात दुःख त्याच्या निकटच्या नातलगांना होते. त्याशिवाय कुणालाही ते विशेष जाणवत नाही. इतर समाज फक्त तत्वज्ञानाच्या चार गोष्टी करून निघून जातो. स्मशानात तर अग्निसंस्काराकरीता आलेले लोक तेथे अनेक प्रकारच्या चर्चा-गप्पा-सिनेमापासून राजकारणापर्यंत करण्यात व्यस्त असतात. तर काही जण तर तंबाखूचा वार भरून विडी सिगारेट पिऊन वेळ घालवितात. आपण तिलांजली देवून केव्हा घराकडे जाऊ त्याची वाट बघत असतात. मृत्यु पावलेल्या व्यक्तिची जीवंतपणी त्याची आलोचना करणारे तो गेल्यावर त्याच्याविषयी चांगलेच उद्गार काढतात. ''तसा माणूस सरळ मार्गी होता, मला मागील आठवड्यातच भेटला होता'' एवढे बोलून त्या व्यक्तिस विसरूनही जात असतील.

गुजरातमध्ये एक चांगली प्रथा आहे. माणूस मृत्यु पावल्यावर तीन-चार दिवसात वर्तमान पत्रात मृत व्यक्तिचा फोटा सह जाहिरात करून दिनांक व वेळ दाखवून 'बेसणू' (शोक दर्शन सभा) श्रद्धांजली ठेवतात. त्यामुळे एकाच दिवशी शोक व्यक्त करणारी माणसे ठराविक वेळी येवून गेलेल्या व्यक्तिचा फोटो समोर पुष्पांजली देवून मृत व्यक्तिच्या नातलगांना भेटून थोडावेळ बसून परत जातात. पण तरीही एका लेखकाने म्हटले आहे की ''Dont send me flowers when I am dead, if you like me send them when I am alive.''

तर आमच्या एक गुजराती लेखक मित्र माझ्याशी बोलताना (अर्थात स्मशानातच) म्हणाला ''मी माझ्या मुलाला सांगुन ठेवले आहे की ''माझ्या मृत्युनंतर 'बेसणू' न ठेवता फक्त वर्तमानपत्रात मला देवाज्ञा झाल्याची खबर देवून त्यात विनंती कर की आम्ही 'बेसणू' ठेवले नाही पण आमच्या परिचितांनी व हितचिंतकांनी माझ्या स्मरणात आपल्या इष्ट देवतांची एक माळ जपून मला श्रद्धांजली द्यावी''

हल्लीच्या तांत्रिक जगात तर काहीजण ट्वीटर किंवा फेसबूकवरून श्रद्धांजली देतात. असं वाटतं की मृत्यु पावलेल्या व्यक्तिला अदृश्य राहून आपल्या मृत्युनंतरच्या समाजातील हे दृश्य पाहण्याची संधि मिळाली तर तो ईश्वराला नक्की विनवण्या करेल कीं मी मृत्यु पावलोय तेच खरय! काही वेळा सिनेमातून सुद्धा काही चांगली वाक्ये संवाद ऐकायला मिळतात उदा. ''लोग मौत को युही बदनाम करते है, तकलीफ तो साली जिंदगी देती है''

जीवनात दोनच प्रसंग संधि असतात. ज्याची माहिती जाण आपल्याला नसते आणि ते म्हणजे जन्म आणि मरण. संपूर्ण आयुष्यात अनेक सर्टिफिकेट्स दाखले आपण स्वतः मिळवून दाखवू शकतो तरीही आपल्या जन्माचे व मरणाचे सर्टिफिकेट दाखला आपण मिळवून स्वतः दाखवू शकत नाही.

महर्षि अरविंद म्हणतात ''खऱ्या स्वरूपाने जीवन जगण्यास प्रतिक्षणी पुनर्जन्माकरीता मृत्युचे भयाचा त्याग करा. कारण त्यामुळेच जीवनाचा आदर्श जागृत होण्याच्या उपायांचा शोध लागतो. आपल्या मृत्युनंतर आपला भार भले दुसऱ्यांना उचलावा लागतो. परंतु जीवनाच्या दुःखाचा भार आपणासच सोसावा लागतो. ज्या व्यक्तिस स्वतःचे जीवन भार वाटत नाही तीच व्यक्ति सुखी जीवन जगू शकते म्हणूनच मृत्युचे भय वाटण्याचे कारण नाही.''

अखेर मृत्यु एक सत्य आहे ज्याचा स्वीकार करावाच लागतो. म्हणूनच दुसऱ्याच्या मरणाचा शोक दाखवून दंभ करणारा केव्हाही स्वतःच्या मृत्यु स्वीकारण्यास तयार नसतो. एका मनोवैज्ञानिकाच्या मते वृद्ध माणसे मरणाची चिंता कमी करतात म्हणून कमी दुःखी होतात. वृद्धावस्थेमध्ये दृष्टिकोनात असे फरक घडत असतात. परंतु असंतुष्ट माणूसच मृत्यूच्या कल्पनेने भयभीत होतो.

आणखी एका लेखकाचे वाक्यसुद्धा समजण्याचा प्रयत्न करणे प्राप्त आहे. तो म्हणतो ''I am not afraid of death I just sent want to be there when it happens.''


ह्या वाक्याचा अर्थबोध काय?

आमचे मामा मात्र वयस्क-म्हातारे झाल्यावर मी त्यांना भेटायला गेलो कि विचारत असे ''मामा कसं काय आहे?'' त्यावर ते म्हणत ''मी तर आता WFD class मध्ये आहे. म्हणजे waiting for death त्याच्या ह्या वाक्याचे मला आता माझ्या जीवनाच्या नवव्या दशकांत आवर्जून स्मरण होते पण त्यांच्या त्या वाक्यात मी बदल करू 'WFD' चे एवजी 'PFD' Prepared for death म्हणतो कारण त्यातच माणसाच्या विवेकाचे व वैराग्याचे दर्शन होईल.

❖

# तेथे कर माझे जुळती

• **शब्दांकन : श्री. सुरेश गो. मराठे** (पृ. ५०३) भ्रमणध्वनी - ९८७००१७१५०



आपल्या मराठे कुलबांधवांमध्ये अनेक कर्तृत्ववान व्यक्ती आहेत हे आपणास परिचित आहेच, तरीही सर्वांचाच परिचय आपल्या कुलबांधवांशी होतोच असे नाही. आपल्या मराठे कुटुंबियातील दोन व्यक्तींचा परिचय या निमित्ताने आपणाला व्हावा यासाठी हा प्रयत्न.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील 'मुटाट' या गावांतील कर्तुत्ववान अशा दोन व्यक्तींचा हा परिचय श्री. विष्णु सखाराम व त्यांचे बंधू श्री. भालचंद्र सखाराम यांची व्यक्तिगत नावे जरी ही असली तरी त्यांना मधुदादा व मराठे डॉक्टर यांच नावाने ते परिचित आहेत.

श्री. मधुदादा मराठे अत्यंत मनमोकळे, गप्पीष्ट म्हणता येईल असे. वयाच्या ८६ व्या वर्षी देखील स्वभाव तसाच मिष्किल व तल्लख. त्यांनी 'मुराट' गावासाठी व समाजासाठी काय केले नाही? कोणाचेही कोणतेही काम अडले की दादाना सांगा काम होऊन जाईल असा विश्वास.

मुटाट येथे प्राथमिक शिक्षण झाल्यानंतर माध्यमिक शिक्षण कोल्हापूर व देवगड येथील मफतलाल गगलभाई हायस्कूल मध्ये. मात्र पुढचे शिक्षण घेण्यासाठी रत्नागिरी अथवा कोल्हापूर येथे जाणे जमले नसावे. गावांतच उद्योग करायचा या हेतुने पीठाची व भाताची (तांदुळ करणे) गिरणी सुरू केली व ती अद्यापही सुरू आहे. त्यांचे घरी सोडा (गोटीचा) व लेमन यांचा छोटासा उद्योग होता व त्यांचे हे प्रोडक्ट अनेक ठिकाणी विशेष करून जत्रा-नाटके या ठिकाणी तसेच किराणा दुकानांमध्येही मिळत असे. सोड्याच्या बाटली फोडतांना कुई असा होणारा आवाज व लेमनची चव अजुनही अनेकांना आठवत असेल (ह्या गोष्टीला सुमारे ५० वर्षे झाली)

गांवा करीता समाजाकरीता यांनी काय काय करावे? पाण्याची कमतरता म्हणून १-१/२ मैलावरून गावांसाठी नळयोजना त्यासाठी परिश्रम, पैसा, वेळ याची गणती नाही. गावांत पोस्ट ऑफिस व्हावे म्हणून सरकारी कार्यालयात चिकाटीने हेलपाटे गावांत माध्यमिक शिक्षणांची सोय व्हावी म्हणून कळकळीचे प्रयत्न त्यासाठी त्यांचे मामा कै. श्रीधर रघुनाथ लेले यांचे मार्गदर्शन व मदत झाली याचा आवर्जून उल्लेख त्यांच्या बोलण्यात येतो. माध्यमिक शाळेनंतर श्री. नानासाहेब राणे व ग्रामस्थ यांच्या सहकार्यानं ज्युनिअर कॉलेज सुरू केले. त्यांचे 'सरपंच' काळात गावांतील रस्ते व विशेष करून मुटाट येथील बंदर धक्का व त्याला जोडणारा रस्ता यांचे पक्के बांधकाम. (काही वर्षापर्यंत विजयदुर्ग बंदर ते खारेपाटण पर्यंत प्रवाशांच्या सोयीसाठी लाँच सर्व्हिस होती) १९६७ ते १९७२ या कालावधीत रत्नागिरी जिल्हा परिषदेवर सदस्य म्हणून प्रचंड मताधिक्याने निवड (काही ज्येष्ठ व्यक्ती त्यांची झेड. पी. मराठे अचाच उल्लेख करीत.) त्यावेळी रत्नागिरी जिल्ह्याचे विभाजन झालेले नव्हते.

श्री. मधुदादा मराठे यांच्या कारकिर्दीचा थोडक्यात आढावा मुटाट गावचे सरपंच-नळ तसेच रस्ता त्यांचे डांबरीकरण १९६२ ते २००५ पर्यंत मुटाट हायस्कुलचे मानद सचिव काम विनामुल्य (प्रवास व अन्य खर्च संस्थेकडून घेतला नाहीच. पदरमोड केली. १९६३ ते २०१४ पर्यंत भारतीय जीवन विमा मंडळाचे प्रतिनिधी व या काळात उत्कृष्ट कामाबद्दल मा. अर्थमंत्री श्री. मधु दंडवते यांचेकडून गौरव व सत्कार राजकारण तसेच समाजकारणातील सर्वच व्यक्तींबरोबर जिव्हाळ्याचे व घरगुती संबंध यामध्ये पक्ष अभिनिवेश नाही.

कै. सुधीर फडके यांचे बरोबर व्यक्तीगत स्नेह संबंध. विजयदुर्ग किल्ल्यांत त्रिशत संवत्सरी कार्यक्रमाचे अध्यक्ष. १९८३-१९८४ या कालावधीत अखिल चित्पावन ब्राह्मण सहाय्यक मंडळाचे अध्यक्ष. या कार्यक्रमास उद्योगपती कै. रावसाहेब गोगटे यांची उपस्थिति मधुदादांच्या प्रयत्नामुळे. १९८४-२००० या कालावधीसाठी सिंधुदुर्ग जिल्ह्याचे महाराष्ट्र

चेंबर्स ऑफ कॉमर्सचे संचालक म्हणून जबाबदारी ही यादी अजुनही वाढेल. मधुदादा स्वतः संगीत जाणकार ‘‘सोड रे सोड रे श्रीधरा शालुच्या पदरा’’ हे त्यांचे गाणे मी ऐकले आहे. ते स्वतः बासरी वाजवायचे. असा हा कलासक्त माणूस या वयातही कोणाच्याही कामासाठी नेहमीच तयार सर्वांशी सतत संपर्क हा यांचा विशेष गुण आहेच ते सहजपणे अरे हा अमुक अमुक घाडी, हा अमुक अमुक भाटले, हा ताम्हणकर, लेले, घाटे, परांजपे यांचा मुलगा-मुलगी, मुंबईला, पुण्यात ठाण्याला असतो असते हे तर ते सहजपणे सांगु शकतात. म्हणूनच जे का रंगले गांजले, त्यांसी म्हणे जो आपुले। तोचि साधु ओळखावा देव तेथेची जाणावा।।

श्री मधुदादा यांना दीर्घायुरोग्य लाभो ही सदिच्छा. ❖

## जननी जन्मभूमीश्च स्वर्गादपि गरियसी

घराचे घरपण
चार भिंतीचे घर हे अपुले,
परसदार अंगण वृंदावनपुढे
जाई-जुई डवरली सभोवती
विहिरीचा रहाट किरकिरे मागुती ।।१।।
भल्या सकाळी हवेच्या झुळकी
नभी उमलते वाटोळी फुलकी
कोंबड्याची बांग चिऊचा चिवचिवाट
किरणांचा भुईवर पसरे सारीपाट ।।२।।
आता गडे इथे तिथे काय काय झाले
नव्या नवलाईने डोळे विस्फारले
काचेच्या भिंती अन् इमल्यावर इमले
बाजूला पाण्यामध्ये लहर हले डुले ।।३।।
विजेरी पाळणा अलगद वर जाई,
जमीनिला मुलामा फरशांचा येई
सोनरी किरणांना रूपेरी धार
एसीचा जणू यांना अडथळा फार ।।४।।
झगमगीत दिव्यांची रांग भली मोठी
चिमुकल्या डोळ्यांना भार तरी किती
मोबाईल, आयपॅड, टीव्ही, संस्कृती
लाईट जाताक्षणी मॉलमध्ये जाती ।।५।।
हाती लांब काठी पाय अनवाणी
दवबिंदूंचे मोती बाळा पायतळी
आनंदे बागडणाऱ्या गावगणपतीची
शहरी भोंदूबाला सर, येईल कशी त्याची ।।६।।
मायेच्या ऊबेस आसुसल्या जीवा
दूधावर साय जशी माझ्या लडीवाळा
येना ग आई, बघ नारे बाळा
मागणे ना संपे कधी अनादी काळा ।।७।।


• **कुमुद सुदाम डोके** (पृ. ३६६)
डोंबिवली (पूर्व)
दूरध्वनी - ०२२-२५८८१६५५


## बायको

बायको नसलेलीच बरी
अहो फिरायला जाताना
एकला चलो हेच बरे
बाहेर पडताना फिरताना
सौ. चे आदेश पाळा जसे
नाकासमोर बघून चाला
धक्का कुणाला मारू नका
धडक कुणाची घेऊ नका
पाहता कशाला इकडे तिकडे
मी घरी असताना।।१।।
बायको...




हॉटेल समोरून जाताना
खमंग सुवास घेताना
बायकोचा सल्ला ऐकाना
दाक्षिणात्य पदार्थ नकोना
पोहे उपीट हवे कशाला
घरी सारे असताना।।२।।
बायको...
मित्र मंडळी हवी बरोबर
मज्जाच मज्जा येई खरोखर
गप्पा टप्पा वादविवाद
जुने पुराणे सूखसंवाद
चूटके विनोदाना मिळे दाद
कधीमधी असे खानाखजाना।।३।।
बायको...
गैसमज नको श्रोते हो
बायको माझी प्रेमळ हो
आमची जोडी राघूमैना
एकमेकाशिवाय कधी गमेना
गोडा संगे तिखट हवे ना
जर तरी स्वातंत्र्य हवे ना।।४।।
बायको...


**- कवि मोरेश्वर मराठे**
सांगली

# मनोबल

• **सौ. माधवी क. जाईल** (पृ. ७५३), पुणे दूरध्वनी – २४२५१३७९



तुकाराम महाराज म्हणतात–

मन गुरु आणि शिष्य। करी आपुलेची दास्य।
प्रसन्न आप आपणास। गती अथवा अधोगती।।

आज माणसाचे मनोबल इतके कमकुवत झाले आहे, की छोट्या छोट्या कारणावरून माणूस आत्महत्या करेपर्यंत पोहचतो परिक्षेत नापास झाला, प्रेमभंग झाला, आपल्या मनाविरुद्ध काही गोष्टी घडल्या की त्याच्या मनावरील ताबाच जातो. त्याची सद्सद्विवेक बुद्धी नाहीशी होते. शेतकरी कर्ज झाले, ते फेडता आले नाही, की आयुष्याला कंटाळून मरणाकडे धाव घेतो.

जीवनात सुख किंवा दुःख आले, आपल्याला जे भोगावे लागते, ते आपले प्रारब्ध अशी समजूत करून, सामान्य माणूस आयुष्य जगत असतो. त्याला कारण त्याचे अज्ञान असते. आज जगात विज्ञानाची एवढी प्रगती झाली आहे, पण माणूस सुखी नाही. सतत स्पर्धा आणि आसक्ती यामध्ये गुंतला आहे. त्यामुळे त्याला विचार करण्यास वेळच नाही.

माणसाला निसर्गाने अर्थात भगवंताने विचार करण्याची सुरेख बहुमोल अशी देणगी दिली आहे. पण या विचार शक्तीचा योग्य तो उपयोग तो करीत नाही. जर त्याने योग्य विचार करून जीवन जगला, तर त्याच्या कितीतरी समस्यांना उत्तर मिळेल. विचार आपल्या आयुष्याला आकार देतात. जसे तुमचे विचार तसे तुमचे आयुष्य हा त्रिकालाबाधीत सिद्धांत आहे. आपला विचार आपल्या आयुष्याला (जीवनाला) आकार देतो म्हणजे आपला जो विचार असेल त्याप्रमाणे आपल्याला घडवतो. म्हणजे 'तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार' आपल्याला जर आयुष्यात यशस्वी व्हायच असेल, तर आपण नेहमी चांगले विचार केले पाहिजेत. चांगले म्हणजे सकारात्मक विचार त्याचा परिणाम अंर्तमनांत रूजतो, आणि तो प्रत्यक्षात येतो. आपले जीवन आपण उत्सवासारखे जगले पाहिजे.

आज आपल्या संस्कृतीचा लोप होत चालला आहे. त्यामुळे मनुष्य लगेच निराशेच्या खाईत लोटला जातो. म्हणून मानवी संस्कृतीचा अवलंब केला पाहिजे. मानवी संस्कृती म्हणजे १) समता २) सभ्यता ३) सामंजस्य ४) सहिष्णूता आणि समाधान. माणसानी माणसाशी माणसासारखे वागले पाहिजे. माणसातील माणूसकीला जाग आली पाहिजे. आज मुलांवर संस्कार करण्यासाठी पालकांना वेळच नसतो. ते करिअर, पैसा आणि स्पर्धा यामागे धावत असतात. आपल्याला भगवंतांनी 'मन' ही प्रचंड शक्ति दिली आहे. पण आपल्या मनाचे लहान मुलासारखे असते. लाड केले तर आपल्या डोक्यावर बसते. जर मनाला मारण्याचा प्रयत्न केला तर ते दबा धरून बसते. व संधी मिळताच आपला घात करते. आपले मन ही आपल्या जीवनाची गुरू किल्ली आहे. ही किल्ली जर आपल्या हाती लागली, म्हणजे मन आपल्या ताब्यात ठेवता आले तर जीवनाचा खजिनाच आपल्या हाती लागतो.

आपली दोन मने असतात एक अंतर्मन (आत्मा) आणि दुसरे बर्हिमन. या बर्हिमनाचा पगडा आपल्यावर जास्त असतो. ती एकमेकांना अत्यंत सूक्ष्मपणे जोडली गेलेली असतात. ती मने एकमेकांवर परिणाम करीत असतात. माणसाचे जीवन घडविण्याचे किंवा बिघडविण्याचे काम मन करीत असते. अंतर्मनाचा (आत्मा) एक मूळ स्वभाव असा आहे की, तुम्ही जे मागाल इच्छा कराल किंवा प्रार्थना कराल, आणि ते तुम्हाला मिळेलच अशी श्रद्धा अंतर्मनावर ठेवता आली, तरच अंतर्मन तुम्हाला साथ देते.

आपले आयुष्य संघर्षमय असते, सतत युद्धपातळीवर जीवन जगत असतो. या युद्धात मनाचे स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. आपले मन आपल्या हातात असेल तर हे युद्ध आपण सहज जिंकू शकतो. मनाचे सामर्थ्य इतके असते की त्याने ठरविले तर तो जग जिंकू शकतो.

आपण त्या भगवंतावर पूर्ण श्रद्धा ठेवली व त्याला शरण गेलो. तर आपण कुठलीही गोष्ट सहज करू शकतो. जो भगवंताला मानीत नाही पण कुठलीतरी शक्ति आहे, असे मानतो, तर त्या शक्तिवर विश्वास ठेवला तर तो आपल्या लक्षापर्यंत पोहचतो. आपल्या मनोबलाने आपण कुठलीही उंची गाठू शकतो.

मला गिरनार शिखरावरील श्री दत्तगुरुंच्या पादुकांचे दर्शन घेण्याची आतून (अंतर्मनातून) खूप ओढ लागली होती. मनोबलाच्या आधाराने आणि भगवंतावर असलेल्या श्रद्धेमुळे. मी त्या गिरनार पर्वतावरील श्री दत्तगुरुंच्या पादुकांचे दर्शन घेऊ शकले. ते एक अवर्णनीय दर्शन होते. नाहीतर त्या दहा हजार पायऱ्या चढणे अशक्य होते. त्यातील १५०० पायऱ्यासाठी डोली करावी लागली. मनोबल आणि श्रद्धेच्या जोरावर कुठलाही त्रास न होता भगवंताच्या चरणाशी सहज जाऊन पोहचले.

भगवंतावर आपण पूर्ण विश्वास आणि श्रद्धा ठेवली तर आपण आपल्या जीवनात नक्कीच यशस्वी होतो. शुद्ध श्रद्धेला निसर्गाच्या नियमानचे किंवा ज्ञानाचे अधिष्ठान असते.

❖

# शुक सोन्याची भरारी - दीक्षित परमधाम ते परमधाम

• **अच्युत म. चक्रदेव** (पृ. ७३२), पुणे
भ्रमणध्वनी - ९६२३५५०६३३

साधारण जानेवारी १९९१ माझी मुलगी कु. देवयानी तथा सविता हिचा विवाहासाठी मी वर संशोधन करीत होतो. नारायण पेठेतील चि. सुहास दीक्षित यांचे स्थळ आले होते. त्यादृष्टीने मी पत्ता शोधत गेलो. पत्ता सापडला वाड्याजवळ फलक होता, ''दीक्षित - परमधाम''. मी वाड्यात प्रवेश केला. सुहासचे वडील 'दादा' समोरच असलेल्या स्वयंपाकगृहांत वृत्तपत्र वाचत बसले होते. ते माझ्याशी बोलू लागले. बोलता बोलता त्यांनी टेबलावर ठेवलेल्या पोपटाचे पिंजऱ्याचे दार उघडले आणि म्हणाले ''सोन्या बाहेर ये. पोपट आज्ञेप्रमाणे बाहेर आला व टेबलावर फिरू लागला. दादा त्याला म्हणाले ''उगीच फिरू नको. पिंजऱ्यांत तुझे खाणे ठेवले आहे. पिंजऱ्याचे दार उघडेच होते. सोन्या पंख फडफडावत पिंजऱ्यात शिरला. आणि वाटीत ठेवलेला खाऊ खावू लागला. मी चकीत झालो. दादा पुढे सांगू लागले ''आम्ही, म्हणजे माझी आई, पत्नी सौ. सुहासिनी व चि. सुहास व आमचा सोन्या पोपट असे घरचे ५ सभासद आहेत. आमचे ज्योतिषी श्री. भट म्हणून आहेत. त्यांना मी मुलीची पत्रिका दाखवतो व तुम्हाला निरोप पाठवतो. तेव्हा तुम्ही मुलीला घेऊन या.'' पुढे सर्व सोपस्कर होवून सविताचा विवाह उत्कृष्टपणे पार पडला. मला एक विशेष वाटले की, सोन्या पोपटाचा आंतर्भाव घरच्या सदस्यांमध्ये केला होता. आणि याची प्रत्यक्ष प्रचिती पुढील काळांत नियमितपणे येत गेली. फक्त दादाच नाही तर सर्व घरच सोन्याची मनःपूर्वक काळजी घेत होते. दीक्षितांच्या घरात येणारे नातेवाईक, परिचित स्नेही, सर्वांनाच विशेषतः त्यांचे घरी आपुलकीने राहिलेली 'अंजू' धरून सर्वांनाच सोन्याचा लळा लागला. हे सर्वच जण घरी येताच इतरांबरोबरच सोन्याचेही कुशल मंगल विचारत. ख्यातनाम गायक भारतरत्न पं. भीमसेन जोशी घरी येताच सोन्याची चौकशी करीत असत, व सोन्याला आपल्या खांद्यावर बसवत. हीच कहाणी प्रसिद्ध बांधकाम व्यवसाय वास्तुतज्ज्ञ श्री. डी.एस. कुलकर्णींच्या बाबतीतही घडायची. सोन्याला सुद्धा या सर्वांचा लळा लागला. आम्ही हे प्रत्यक्ष पाहिले आहे की सोन्यासुद्धा पंडीत भीमसेनजींचे गाणे विशेष रूची घेवून ऐकायचा, त्यांचे गाणे मधेच कोणी बंद केले की, तो रागावून एकदम पंख फडफडावयाचा व नाराजी व्यक्त करायचा. दीक्षित कुटुंबीय बाहेर जातांना कायम पिंजऱ्यांतून सोन्याला घेवून जात असत.

हे सर्व साग्रसंगीत चालू असतांना एके दिवशी म्हणजे दि. २४ फेब्रुवारी रोजी माझ्या नातवाचा दूरध्वनी आला ''अप्पा वाईट बातमी आहे त्याचाही सूर रडकाच होता अहो अप्पा आपला सोन्या आज मृत्यू पावला. सकाळी त्याने पाणी प्यायले होते. अंजूच्या ते लक्षात आले तिने सुहासिनी ताईंना ओरडून सांगितले की, ''अहो लवकर या आपला सोन्या कसंतरीच करतो आहे.'' ताई धावतच आल्या, त्यांनी त्याला मांडीवर घेतले. त्याला पाणी पाजले. सोन्याने कसे तरी त्यांचेकडे पाहिले आणि मान टाकली आणि त्याने दीक्षित परमधामांतून आयुष्यातली एकूलती एक मोठी भरारी परमधामाकडे मारली.

सोन्या गेला तेव्हा त्याचे वय २९ वर्षांचे होते (अंदाजे) मला पुष्कळ वेळा असे वाटायचे की सोन्याने संधी साधून आकाशात विहार करायला जावे अशा वेळी पुढील काव्यपंक्ती आठवतात. श्रेष्ठ गायक सुधीर फडकेंनी त्या गायल्या आहेत.

''सोडी सोन्याचा पिंजरा - आकाशी झेप घेरे पाखरा
तुझ भवती वैभव माया, फळ रसाळ मिळते खाया
सुख लोलूप झाली काया, हा कुठवरी वेड्या घेशी आसरा
घर कसले ही तर कारा
विष समान मोतीचारा
मोहाचे बंधन पाळा तुज आडवतो कैसा हा उंबरा
तुज पंख दिले देवाने कर विहार सामर्थ्याने
चरी डोंगर हिरवी राने जा ओलांडूनी सरिता सागरा।।

ऑस्कर पुरस्कार प्राप्त ''आदि शंकराचार्य'' ह्या चित्रपटात आदि शंकराचार्य व पं. मंडन मिश्र यांचा वादविवाद खंडन-मंडन दाखवले आहे. पं. मंडनमिश्रांचे घरचा पोपटही काही तात्त्विक चर्चा करताना उत्कृष्टपणे दाखवला आहे. सोन्यांचाही समज तशीच होती.

पोपटांबद्दल आणखी एक आठवण म्हणजे मी बुलढाणा कारागृहाचा अधीक्षक म्हणून काम पहात होतो. कारागृहाचे तटाचे दर्शनी भागांत पोपटांची असंख्य घरे होती. वरीष्ठ अधिकाऱ्यांनी तपासणी फेरीत ती घरटी पाहिली आणि आदेश दिले की सुरक्षिततेचे दृष्टीने ही घरटी धोकादायक आहेत ती ताबडतोब बुजवून टाका. आदेशानुसार बांधकाम खात्याचे काही कर्मचारी आले आणि त्यांनी ती घरटी बुजवायला सुरुवात केली. मी त्या कर्मचाऱ्यांना सांगितले की, ''ज्या घरट्यांत

पोपटांची पिले असतील ती मात्र बूजवूं नका.'' त्याबद्दलचा निर्णय आपण नंतर घेवू. पण आपली घरटी बुजवली जात आहेत हे त्या तटाला लावलेल्या शिड्यांवरून पोपटांना कळले असावे, कारण अकस्मात एक मोठी हिरवी कमान येतांना दिसली आणि पोपटांनी पोपटटाट सुरू केला. चिमण्यांचा चिवचिवाट तसा पोपटांचा पोपटटाट नमूद केला आहे. विशेष आश्चर्य म्हणजे काही बुजवलेली घरटी पोपटांनी आपल्या चोचीचे साहाय्याने पुन्हा उकरून काढली.

सोन्या पोपटाला सद्गती व शांती लाभो हीच परमोत्कट शुभेच्छा!

''दीक्षितांचे दुःखांत आम्हीही सहभागी आहोत.''

❖

---

चतुर बिरबलच्या बालकथा

# । बालोद्यान ।

## फाशीची शिक्षा



बादशहा अकबर खूप संतापला की, तो समोरच्या माणसाला वाट्टेल ती शिक्षा सुनवायचा. एका दिवसाची गोष्ट. बादशहा एका माणसावर खूपच रागावला होता. त्या माणसाची चूक होती. परंतु त्याने ती मुद्दाम केली नव्हती. त्याच्या हातून गुन्हा घडला होता. रागाच्या भरात बादशहाने त्याला फाशीची शिक्षा ठोठावली. योगायोगाने बिरबल तिथे होता. त्याला त्या माणसाची दया आली. बादशहाचे लक्ष चटकन बिरबलाच्या चेहऱ्याकडे गेले. आता बिरबल या माणसासाठी नक्कीच आपल्याकडे याचना करणार, याबद्दल बादशहाला खात्री होती. म्हणून तो रागाने ओरडला, 'बिरबल, तू या माणसासाठी मला काहीही करायला सांगू नकोस आणि तू जर मला काही करायला सांगितलेस, तर मी त्याच्या नेमके विरूद्ध करीन, सांगून ठेवतो!' बादशहा बोलायचा थांबताच बिरबल चटकन ओरडला, 'जहाँपनाह! या माणसाला आताच्या आता फाशी द्या!' बादशहाला काय करावे ते समजेना, बिरबलाचे चातुर्य पाहून त्याला हसू आले. तो राग विसरला, बोलल्याप्रमाणे त्या माणसाची फाशी त्याला रद्द करावी लागली. बादशहाने त्या माणसाला सोडून दिले.

---

## फुलपाखरू छान किती दिसते...

फुलपाखरांचे मुख्य अन्न फुलांचा रस आहे. पण काही फुलपाखरे पिकलेली फळे आणि फुले खातात. भारतात आसाम राज्याच्या जंगलातील फुलपाखरे झाडांची पाने खातात. 'डॉलियास इंडिका' नावाच्या फुलपाखराचा कस्तुरीसारखा मादक वास येतो. शल्फर नावाच्या फुलपाखरांना गोड सुगंध असतो. फिटिलरीज फुलपाखराच्या शरीराला चंदनासारखा वास येतो. मोनार्क नावाचे नारंगी आणि काळ्या रंगाचे फुलपाखरू अमेरिका आणि ब्राझीलच्या घनदाट जंगलात सापडते. ही फुलपाखरे भारतीय फुलपाखरांपेक्षा आकाराने मोठी असतात. फुलपाखराचे आयुष्य खूप कमी असते. कारण जास्त लांब उडल्यामुळे पंख फाटतात. त्यामुळे त्यांना उडता येत नाही. फुलपाखरांची स्मरणशक्ती खूप चांगली असते.



जगात शेकडो प्रकारची फुलपाखरे आढळतात. प्रत्येक देशातल्या फुलपाखरांमध्ये खूप फरक असतो. द. अमेरिका, आफ्रिका तसेच ब्राझील या देशामध्ये जास्त फुलपाखरे आढळतात. ब्रिटनमध्ये फुलपाखरांच्या जवळपास ८० जाती सापडतात. भारतात ३०० जाती आणि श्रीलंकेत २०० जातींची फुलपाखरे सापडतात. कॅनडामध्ये पांढऱ्या आणि काळ्या रंगांची फुलपाखरे सापडतात. काही फुलपाखरे विचित्र असतात. हे फुलपाखरू लांब उडते. 'अपोलो' नावाचे फुलपाखरू पांढऱ्या रंगाचे असते. ॲडमिरल नावाच्या फुलपाखराचे पुढचे पंख मखमली आणि मागचे पंख लाल आणि पांढरे असतात.

# संवाद कुलबांधवांशी

• **श्री. हेमंत मराठे** (पृ. २१), नालासोपारा (प) भ्रमणध्वनी – ९८२२८४७१२०/९२२०६९९९५७

मराठे कुलबांधव भगिनींनो, नमस्कार. सध्या आपला मराठे मंडळींचा एकमेकांशी संवाद खूपच चांगल्या प्रकारे वाढला आहे.गेल्या वर्ष दीड वर्षांमधे तीनचार वेवेगळ्या कार्यक्रमांद्वारे आपणाला एकमेकाना भेटण्याचा योग आला. सुरुवातीला हितगुजच्या शंभराव्या अंकाचा प्रकाशन समारंभ, दादर, मुंबई येथे खूप मोठ्या उत्साहात साजरा झाला. त्यानंतर उद्योग पुरस्कार सोहळा व विभागीय मेळावा बोरिवली येथे श्री. दिलिप मराठे आणी कुटुंबियांच्या आयोजनाने संपन्न झाला. तद्नंतर २०१५ ची वार्षिक सर्वसाधारण सभा पुणे येथे चांगल्या उपस्थितीत पार पडली. शेवटी जानेवारी २०१६ मध्ये अ. भा. संम्मेलन सांगली येथे विक्रमी उपस्थितीत पार पडले. या वारंवार होणाऱ्या कार्यक्रमांमुळे व त्याचबरोबर सोशल साईट्स म्हणजे व्हॉट्सअॅप आणि फेसबुकवरील ग्रुपमुळे आपण सर्वजण एकमेकांच्या खुपच जवळ आलो आहोत, संपर्कात आलो आहोत. हे टिकवणे गरजेचे आहे, त्यासाठी मी काही गोष्टी सुचवत आहे.

आपण सर्व मराठे बंधु भगिनी खुप हुशार आहात. बऱ्याच जणांनी वेवेगळ्या क्षेत्रामधे यश मिळवले आहे. काही छोट्या प्रमाणात असेल किंवा मोठ्या प्रमाणात. परंतु हे यश, ही हुशारी आपल्याच परिवाराला माहीती नसते. कारण आपण स्वत:हून या गोष्टी इतरांना सांगत नाही. माझी आपणा सर्वांना अशी विनंती आहे की आपण आपआपल्या क्षेत्रामधे जर काही उल्लेखनीय यश मिळवले असेल तर आपण लिहिते व्हा आणि आपल्या स्वतः बद्दल लिहून पाठवा. जास्तीतजास्त लिखाणाला हितगुजमधे प्रसिद्धी दिली जाईल. क्षेत्र कोणतेही असो, स्वयंपाकघरापासून शैक्षणिक यशापर्यंत, उद्योगांतील प्रयोगांपासून संशोधनांपर्यंत. कोणतेही क्षेत्र वर्ज्य नाही. तेव्हा लेखणी उचला अथवा ईमेल करा.

आपला जो उद्देश मी वारंवार या सदरामधे अधोरेखित केला होता तो म्हणजे जिथे जिथे शक्य असेल तिथे विभागीय मेळावे आयोजीत करणे त्यामुळे जवळपासच्या लहानथोर सर्वांनाच उपस्थित रहाता येते. त्यालाच अनुसरुन कर्नाटक परिवारातर्फे १ मे २०१६ रोजी श्रुंगेरी येथे एक दिवसीय मेळावा मोठ्या उत्साहात साजरा झाला. त्याला आपल्या गोव्यातील कुलबांधव उपस्थित होते.

अशाच प्रकारे इतर ठिकाणीसुद्धा विभागीय मेळावे घेण्याचे ठरत आहे. आपण जेवढा उत्साह दाखवाल तेवढे लवकर आपल्या विभागात मेळावा घेता येईल. म. प्र.ने वेगवेगळ्या विभागामधे कार्यकर्ते नेमले आहेत त्यांच्याशी संपर्कात रहावे.

आपण सर्वानी एकमेकांना भेटण्यासाठी/परस्पर संवादासाठी जास्तीत जास्त वेळ द्यावा असं वाटतं. परस्पर संवादाने विचारांचं आदानप्रदान होतं. ज्ञान वाटल्याने वाढतं असं म्हणतात. परस्पर संवादाचा आणि ज्ञानदानाचा हा स्रोत सतत वाहता राहावा असं वाटतं.

एप्रिल मे हा सुटीचा काळ आता जवळजवळ संपल्यातच जमा आहे. काहींनी आपली सुटी थंड हवेच्या ठिकाणी घालवली असेल. तर आपल्यापैकी बरेच जण या सुट्यांमध्ये आपापल्या गावी गेला असाल. आंबे, फणस यांवर ताव मारला असेल. या सर्वाची मजा काही औरच असते नाही? आपल्या सर्वांची मुळं कोकणात आहेत. आणि कोकण म्हणजे तर नंदनवनच. त्यामुळे आपली मुळं आपल्यापैकी कोणी विसरणं शक्यच नाही.

आपलं 'हितगुज' हे त्रैमासिक आहे. आणि ते असेच अखंड सुरु राहण्यासाठी आपलं एकमेकांशी होणारं हितगुज सहाय्यभूत ठरेल हा विश्वास व्यक्त करून मी आपली रजा घेतो.

❖

## चुकीची दुरुस्ती

हितगुज मार्च २०१६च्या अंकात 'जाने वो कैसे लोग थे' – हेमंतकुमार हा लेख श्री. सुधाकर दत्तात्रेय मराठे यांनी लिहिला आहे. चुकून लेखकाचे नाव श्री. सुधाकर प्रभाकर मराठे हे छापले गेले. क्षमस्व

## नोंद

श्रीमती संध्या खांबेटे (पृ. ६९६) यांनी सांगली येथील संमेलनात गाण्याच्या उत्कृष्ट कार्यक्रम सादर केला. त्यांना तबल्याची उत्तम साथ श्री. संदीप पवार यांनी केली. श्री. अरविंद मुळगांवकर हे त्यांचे गुरु आहेत. श्री. संदीप पवार यांच्या तबलासाथीमुळे संध्याताईंचे गाणे खुलले.

**सुविचार**

'धीरे-धीरे रे मना, धीरे सब कुछ होय।
माली सींचे सौ घड़ा, ऋतु आए फल होय'।।

**– संत कबीर**

# मराठे प्रतिष्ठानद्वारा गुणवत्ता पारितोषिके

• **श्री. हेमंत अरुण मराठे** (पृ. २१), नालासोपारा भ्रमणध्वनी - ९८२२८४७१२०/९२२०६९९९५७

**मराठे प्रतिष्ठानद्वारा गुणवत्ता पारितोषिकांचे स्वरूप पुढीलप्रमाणे असेल.**

१) इयत्ता ४ थी आणि इयत्ता ७ वी, प्राथमिक आणि माध्यमिक स्कॉलरशिप परीक्षा - इयत्ता ४ थी, रु. २००/-चे पारितोषिक, स्कॉलरशिप प्राप्त प्रत्येकाला.
सर्वांत जास्त गुण प्राप्त करणाऱ्यास 'कै. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक' रु. ३००/-
इयत्ता ७वी - रु. ३००/-चे पारितोषिक, स्कॉलरशिप प्राप्त प्रत्येकाला
सर्वांत जास्त गुण प्राप्त करणाऱ्यास 'कै. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक' रु. ४००/-

२) इयत्ता १० वी - ८५% ते ९०% गुण प्राप्त करणाऱ्यास रु. ८००/- ९०% पेक्षा जास्त रु. १०००/-
सर्वांत जास्त गुण प्राप्त करणाऱ्यास 'कै. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक' रु. ५००/-

३) इयत्ता १२ वी -
आर्टस्/कॉमर्स :
७०% ते ८०%- रु. ७००/-
८०% ते ९०%- रु. ८००/-
९०% पेक्षा जास्त रु. १०००/-
सायन्स : ८०% ते ९०% - रु. ८००/-
९०% पेक्षा जास्त रु. १०००/-
सर्वांत जास्त गुण प्राप्त करणाऱ्यास 'कै. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक' रु. ६००/-

४) पदवी - B.A., B.Com. B.Sc.,
सर्व ७५% पेक्षा जास्त गुण प्राप्त करणाऱ्यांस रु. १२००/-

५) पदव्युत्तर -M. A., M.Com., M.Sc.
प्रत्येक शाखेतील सर्वप्रथम २ विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु. १५००/-
C.A., L.L.B., Enginear, Medical प्रत्येक शाखेतील सर्वप्रथम विद्यार्थ्यास रु. १५००/-


६) विशेष नैपुण्य, (नृत्य/कला/ अभिनय)
राज्य अथवा राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कारप्राप्त, व्यक्तीस रु. १५०/-
याशिवाय देण्यात येणारी पारितोषिके पुढीलप्रमाणे.

- गणेश तांत्रिक पारितोषिके रु.५००/- तांत्रिक विषय घेऊन उच्च श्रेणी मिळवल्यास अथवा, १० वी नंतर तांत्रिक शाखेमध्ये प्रवेश घेणाऱ्यास
- इयत्ता १० वी बोर्डात हिंदी विषयामध्ये सर्वप्रथम - रु. १००/-
- इयत्ता १० वी बोर्डात इंग्लिश विषयामध्ये सर्वप्रथम - रु. ५००/-
- लीला दिगंबर मराठे नाशिक यांनी हे पारितोषिक पुरस्कृत केले आहे.
- नॅनोटेक्नॉलॉजी मध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास श्री. वा. ग. मराठे, पुणे यांनी ही स्कॉलरशिप पुरुस्कृत केली आहे.
- वैदिक शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यास कै. श्रीमती शालिनीताई मराठे, मुंबई यांनी ही स्कॉलरशिप पुरस्कृत केली आहे.
- श्री. प्रमोद मराठे ठाणे पुरस्कृत. दहावीत सर्वात जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला.

❖

## जरा हसा की...!

बसमध्ये अतिशय गर्दी होती. एक अतिशय जाडी महिला बसमध्ये चढली गर्दीमुळे ती महिला चिंटू शेजारीच उभी होती.
चिंटू म्हणाला, ''मम्मी, ही बाई आहे!''
''हो बेटा ही बाईच आहे! पण चिंटू मोठ्यांबाबत असे बोलू नये.''
''वा गं! मम्मी तू आताच डॅडींना म्हणत होतीस की, हा रणगाडा बसमध्ये कुठून आला.''




**श्री. सुरेश दादा मराठे यांच्या पंच्याहत्तरी निमित्त अभिष्टचिंतन आणि 'काव्य पदी' पुस्तकाचे प्रकाशन**

# ज्येष्ठ कवयित्री संजीवनी मराठे

• माधव मराठे

भ्रमणध्वनी – ९०२२४१७०२१

कवितेच्या माध्यमांतून तरल आणि संजीवक स्वप्नांची निर्मिती करणाऱ्या संजीवनी मराठे यांचे हे जन्मशताब्दी वर्ष आहे..

'संजीवनी' या नावाने काव्यलेखन करणाऱ्या संजीवनी मराठे यांच्या कविता आणि गीते यांनी मराठी मनाला एकेकाळी मोहिनी घातली होती. त्या कवयित्री तर होत्याच, शिवाय कविसंमेलनात स्वत:च्या कविता सुरेल आवाजात त्या गातही असत. १४ फेब्रुवारी १९१६ ला त्यांचा जन्म झाला. शाळकरी वयातच त्या कविता लिहू लागल्या. १९३२ साली कोल्हापूरला भरलेल्या साहित्यसंमेलनात त्यांचा काव्यक्षेत्रात प्रवेश झाला. त्यांचा पहिला कवितासंग्रह 'काव्यसंजीवनी' त्याच वर्षी प्रकाशित झाला. पुढे 'राका', 'संसार', 'छाया', 'चित्रा', 'चंद्रफूल', 'मी दिवाणी', 'आत्मीय' अशा अनेक कवितासंग्रहातून आणि 'भावपुष्प' व 'परिमला' गीतसंग्रहांतून त्यांची काव्यजीवनातील वाटचाल रसिकांना अनुभवता आली.

संजीवनीबाईंची कविता तरल आणि संजीवक स्वप्नांची निर्मिती करणारी आहे. त्यांची स्वप्ने निसर्ग सौंदर्याबरोबरच मानवी जीवनातील शाश्वत मूल्यांकडेही सौंदर्यदृष्टीने पाहणारी आहेत कविता 'स्फुरते कशी' या त्यांच्या सुप्रसिद्ध कवितेत त्या शब्दांच्या गौळणींना स्वप्नसख्याच म्हणतात.

'प्रेम' हेही त्यांच्यासाठी एक मनोमन जपलेले स्वप्नच होते.

'प्रेम असते ज्याचे नाव<br>
सारे जगच त्याचे गाव'

असे विश्वाकार अनुभूती देणारे प्रेम जसे त्यात अभिप्रेत असते, तसेच त्यांच्या लेखी व्यक्तिगत जगण्याला अर्थपूर्णता देणारे ते एक चिरंतन मूल्यही असते.

आपल्या 'मी दिवाणी' या कवितासंग्रहात कवयित्रीने आपले मनोगत दिले आहे. त्या लिहितात की, त्यांच्या घराने बालवयापासून त्यांच्या कवितांना प्रोत्साहन दिले. त्यांचे वडील रसिक होते. ते थिऑसॉफीच्या प्रभावामुळे धार्मिक कर्मकांडांपासून लांब होते, मात्र त्यांची दृष्टी सांस्कृतिकदृष्ट्या कर्मठ होती.

संजीवनीबाईंवर भा. रा. तांबे यांच्या भावगीतांचाही प्रभाव होता. आणखीही एका कवीचा त्यांच्यावर प्रभाव होता, तो कवी म्हणजे रवींद्रनाथ टागोर. टागोरांच्या 'गीतांजली' आणि 'गार्डनर'मधील निसर्गरूपात परमतत्त्व पाहण्याच्या दृष्टीचा ठसा संजीवनीबाईंच्या कवितांमध्येही जाणवतो. संजीवनीबाईंची संसारी भावभावनांची कविता प्रेमरसापासून वत्सलरसापर्यंतच्या गृहिणीपदाच्या छटा घेऊन येते, हे खरे. पण त्यांच्यातील स्त्रीत्वाचे स्वप्न गृहिणीपणाशीच थांबत नाही, हेही खरे म्हणूनच त्या जणू सर्वसामान्य स्त्रीच्या आटोक्यात भव्य स्वप्ने आणून ठेवताना लिहून गेल्या आहेत.

''मी कांता, मी माता, शिक्षक मी, सेवक मी<br>
कलावती, शास्त्रज्ञा, विविधगुणी नटते मी<br>
विश्वाची मी प्रतिभा, मजमधि समृद्धि वसे<br>
संस्कृती मी जणू समूर्त, स्त्री माझे नाव असे''

त्यांच्या या ओळींचे आवाहन स्त्रीमनाला कायमच होत राहील

संजीवनीबाईंच्या बालकविताही लक्षवेधी आहेत. बालमनाची संवेदनशीलता लक्षात घेऊन त्यांनी शिशुगीते, कुमारगीते लिहिली आहेत. त्यात वात्सल्यभावनेचा परिपोष आढळतो. त्याचबरोबर मुलांचे खेळकर, चंचल, निरागस भावजीवन त्यात प्रतिबिंबित झालेले दिसते. मुलांशी संवाद साधत लिहिलेल्या या गीतांमध्ये गोडवा आहे.

लीला मस्तकार–रेळे या लेखिकेने 'कल्लोळ' या आपल्या आत्मचरित्रात संजीवनीबाईंविषयी लिहिले आहे. त्या म्हणतात, त्या काळातील आधुनिक तरुण कवयित्रीत आणि काव्यगायिकांत संजीवनी अग्रगण्य होती. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या सुवर्ण महोत्सवात ६००० प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करणारी संजीवनी माझ्या डोळ्यांसमोर होती. यशवंत, गिरीश, बोरकर, मायदेव इत्यादी कवींच्या घोळक्यात स्त्रियांतर्फे संजीवनी धिटाईने पुढे झाली आणि जराही न गडबडता तिनं आपलं मधुर काव्य पेश केलं. आणखी एका गोष्टीमुळे त्या काळात संजीवनीचं नाव गाजत होतं. 'साखरपुडा' बोलपटातील पदे संजीवनीने केली होती.

**(डॉ. नीलिमा गुंडी– यांच्या लोकसत्ता मधील लेखावर आधारित)**

❖

सु वि चा र

सत्य असत्यासी मन केले ग्वाही।<br>
मानियले नाही जनलोका।

**– संत तुकाराम**

सु वि चा र

# श्रीजनार्दन स्वामींची दत्तोपासना

• **डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे** (पृ. १२०) दूरध्वनी - २४१५०८८९

**जनार्दनस्वामी - (शके १४२६-१४९७)**

श्रीजनार्दनस्वामी मूळचे चाळीसगावचे देशपांडे. ऋग्वेदी आश्वलायनसूत्री देशस्थ ब्राह्मण असून त्यांचा जन्म शके १४२६ फाल्गुन वद्य षष्ठी यादिवशी झाला. ते पूर्वऋणानुबंधाने यवनांच्या सेवेत पडले आणि देवगड ऊर्फ दौलताबाद तर्फेचे मुख्य अधिकारी व यवन पातशहाचे विश्वासु मुत्सद्दी झाले. जनार्दन स्वामी मोठे शूर, करारी स्वभावाचे, फार टापटीपीचे व तेजस्वी पुरुष होते. यवनसेवेत जीवन कंठीत असतानांही त्यांनी आपली स्वधर्मनिष्ठा आणि स्वधर्मोचित साधना ढळू दिली नाही. त्यांच्या साधुत्वाचा प्रभाव हिंदूप्रमाणेच मुसलमानांवरही पडलेला होता. जनार्दनस्वामींच्या हुकूमावरून पातशाही दरबारात शुक्रवार ऐवजी गुरुवारी देवगडावर सुट्टी दिली जात होती.

**दत्तसाक्षात्कार**

जनार्दनस्वामींनी प्रपंच व परमार्थ या दोघांची अुत्तम सांगड घातली होती. ते दत्तात्रेयाचे अनन्यभक्त होते. पहाटे अुठल्यापासून ते मध्यान्ह कालापर्यंत स्नानसंध्या, समाधी व दत्तसेवा यांत ते निमग्न असत. त्यांना श्रीदत्ताचे दर्शनही झाले होते. याविषयी एकनाथांनी आपल्या एकादश - टीकेत जनार्दनस्वामींना झालेल्या दत्तसाक्षात्काराचें वृत्त विस्तृतपणे सांगितले आहे ते पुढीलप्रमाणे -

गुरुप्राप्तीलागी सर्वथा।
थोर जनार्दनासी चिंता।
विसरला तिन्ही अवस्था।
सद्गुरु चिंतितां चिंतनी।।४३१।।
देवोभावाचा भोक्ता।
दृढ जाणोनि अवस्था।
येणें जाहलें श्रीदत्ता।
तेणें हातु माथां ठेविला।।४३२।।
हातुं ठेवितांचि तत्काळ।
बोध आकळिला सकळ।।
मिथ्या प्रपंचाचें मूळ।
स्वरुप केवळ स्वबोधें।।४३३।।
कर्म करूनि अकर्ता।
तोचि अकर्तात्मबोधु जाहला देता।
देहीं असोनि विदेहता।
ते ही तत्वतां आकाळली।।४३४।।
गृहाश्रमु न सांडिता।
कर्मरेखा नोलांडिता।
निजव्यापारी वर्तता।
बोधु सर्वथा न मैळे।।४३५।।
तो बोधु आकळितां मना।
मन मुकले मनपणा।
अवस्था नावरेचि जनार्दना।
मूर्च्छापन्न पडियेला।।४३६।।
त्यासी सावध करूनि तत्वतां।
म्हणे प्रेमा आहे सत्त्वावस्था।
तोही गिंळोनि सर्वथा।
होई वर्तता निजबोधें।।४३७।।
पूजाविधी करोनियां।
जंव जनार्दनु लागला पायां।
तव अदृश्य जाहला श्रीदत्तात्रेया।
योगमायचेनि योगे।।४३८।।

(- अ.९; एकनाथी भागवत)

श्रीजनार्दनस्वामी श्रेष्ठ दर्जाचे योगी सत्पुरुष होते. त्यांची योगसाधना अतिशय प्रखर होती. देवगिरीच्या ईशान्य अुत्तर भागाला किल्ल्यापासून पाच-सहा मैलांवर शूलभंजन नावाचा पर्वत आहे. शिखराचे सपाटीवर दोन सरोवरे आहेत. तेथे सूर्यकुंड आणि चंद्रकुंड आहेत. कुंडाजवळ आवळी, अुंबर, पिंपळ, पारिजातक इत्यादी झाडे ओळीने आहेत. जनार्दनस्वामींचे अनुष्ठान, एकांत, दत्तदर्शन येथेच होत असे. प्रत्येक गुरुवारी



जनार्दनस्वामी या सूर्यकुंडावर जाऊन प्रत्यक्ष दत्ताचे दर्शन घेत असत. त्यावेळी प्रत्यक्ष श्रीदत्तात्रेय तेथील ओट्यावर येऊन बसत; अशी आख्यायिका सांगितली जाते.

**जनार्दनस्वामींची ग्रंथ रचना**

जनार्दनस्वामींनी अनेक स्फुट अभंग केलेले असून, त्यांनी 'आत्मानात्मविवेकसार' आणि 'जानकीस्वयंवर' हे दोन ओवीबद्ध ग्रंथ लिहिले आहेत. त्याचप्रमाणे त्यांच्या 'आत्मानात्मविवेक' या ग्रंथात ज्ञानेश्वरीतील वचनेही आढळून येतात. अनेक कोष्टकांच्या साहाय्याने जनार्दन स्वामींनी आपल्या ग्रंथाचा विषय सुस्पष्ट केला आहे. या ग्रंथाची रचना गुरुशिष्य संवादात्मक आहे. 'आत्मानात्माविवेकसार' हा ओवीवृत्तात्मक ग्रंथ त्यांनी पंचीकरणावर लिहिलेला आहे. त्यांनी उपनिषदवेदान्त भावगीता रचिली आहे.

**जनार्दनस्वामींचे गुरु**

जनार्दनस्वामींचे नेमके गुरु कोण याविषयी बरेच मतभेद आहेत. जनार्दनस्वामींना नृसिंहसरस्वतींचा उपदेश होता असा एक समज आढळतो. परंतु तो उपदेश प्रत्यक्ष झाला नसून स्वप्नोपदेश असावा. कारण नृसिंह सरस्वती शके १३८० मधे 'निजानंदी बैसले' असून जनार्दनस्वामीं मात्र पुढे ४६ वर्षांनी जन्मले आहेत. जनार्दनस्वामींचा जन्म शके १४२६ असा आहे. शेख महमंद 'योगसंग्राम' ग्रंथात म्हणतो– ''ॐ नमोजी श्रीसद्गुरु चांदबोधले। त्यांनी जानोपंता अंगिकारिले। जानोबाने एका उपदेशिलें। दास्यत्वगुणे।।''

शेखमहमंदाचे गुरु नाशिकचे चंद्रबोध नावाचे ब्राह्मण होते, हेच चंद्रभट कालान्तराने सूफी झाले व त्यांनी जनार्दनस्वामींना उपदेश केला असे काही विद्वान मानतात. परंतु या नव्या संशोधनास एकनाथांच्या वाङ्मयात फारसा आधार नाही. जनार्दनस्वामींना साक्षात् दत्ताचा अनुग्रह व अुपदेश होता. नाथांनी म्हटले आहे,

'दत्तात्रेयशिष्य परंपरा।
सहस्रार्जुन यदु दुसरा।
तेणें जनार्दनु तिसरा।
शिष्य केला खरा कलीयुगी।।''

नारायण – अत्री – दत्तात्रेय – जनार्दन अशीच गुरुपरंपरा सांप्रदायिक मानतात.

**श्रीजनार्दनस्वामींची समाधी**

जनार्दनस्वामींनी राजकारण, परमार्थ व प्रपंच, योग योग्यरीतीने सांभाळून शके १४९७च्या फाल्गुन वद्य षष्ठीस आपला अवतार संपविला. त्यांचा जन्म, त्यांना दत्तदर्शन, शिष्य एकनाथांना बोधदान आणि समाधीयोग यांचा दिवस फाल्गुन वद्य षष्ठी हाच आहे. आणि योगायोग असा की एकनाथांच्या समाधीचा दिवसही फाल्गुन वद्य षष्ठी असाच आहे.

श्रीजनार्दनस्वामींची समाधी देवगडच्या किल्ल्यात असल्याचा गैरसमज प्रचलित आहे. परंतु तो दूर झाला पाहिजे. त्यांची समाधी देवगडच्या किल्ल्यात नसून ती नगर जिल्ह्यातील पाथरी गावापासून सुमारे १० मैलावरील खरवडी या गावानजिक आहे. ही समाधी अतिशय भव्य आहे. एकनाथ महाराजांनी जनार्दन स्वामींच्यासंबंधी पुढील उल्लेख केलेला आढळतो.

श्रीजनार्दन गुप्त।
दत्त आज्ञा विचारीत।
 दत्तआज्ञा वंदुनी शिरीं।
 तेथुनी निघाले झडकरी।।
आदिस्थान देवगिरी।
मग आले ब्रह्मपुरी।
 धरिला दक्षिणेचा पंथ।
 स्वामी आले केदारांत।
पूजा केली केदाराची।
इच्छा झाली समाधीची।
 दक्षिणेसी हरिहर।
 धौम्यऋषींचा डोंगर।।
पाहोनिया धौम्यस्थळ।
सभोवती ऋषिमंडळ।।
 हरिहराचे पूजन।
 धौम्यऋषीचें दर्शन।।
तेथे घेतली समाधी।
एका जनार्दन वंदी।।

या उल्लेखानुसार जनार्दनस्वामींनी धौम्यस्थळी समाधी घेतली हे स्पष्ट होते. हे ठिकाण नगर जिल्ह्यात, जामखेड आणि शेवगाव तालुक्यांच्या सरहद्दीवर असून तेथे स्वामींची समाधी आहे. येथे दरसाल उत्सव होत असतो. काही संशोधकांच्या मते महानुभवांचे दत्तस्थान जे खरवंडी आहे, तेथे स्वामींनी समाधी घेतली असावी.

महाराष्ट्रात, अशारीतीने जनार्दनस्वामींपासून दत्त्योपासनेची एक परंपरा समृद्ध झालेली आहे. एकनाथांनी दत्तभक्ती, विठ्ठलभक्तीत विलीन करून टाकली असली तरी जनार्दनस्वामींच्या कृपेने जागृत झालेला दत्तभक्तीचा धागा अतूट होता.

'धन्य गुरु जनार्दन।
स्वानंदाचे जे निधान'
किंवा
जनार्दनाचा गुरु।
स्वामी दत्तात्रय दातारु।

त्यांनी अुपकार केला।
स्वानंदाचा बोध दिला।
सत्‌चित्‌ सुखाचा सानुभव।
दाखवला स्वयमेव ।।
एका जनार्दनी दत्त।
वसे माझ्या हृदयांत।।

एकनाथ महाराजांनी जनार्दनस्वामी विषयी जे लिहिलेले आहे त्यावरून जनार्दनस्वामी कसे दत्तोपासक होते याचे स्पष्ट दर्शन आपणास होते. परंतु जनार्दनस्वामींचे अस्सल अभंग अनुपलब्ध असल्यामुळे त्यांच्या समोरील दत्तात्रेयाची ध्यानमूर्ती कशी होती, इत्यादीबद्दल काहीच माहिती मिळू शकत नाही.

❖

# धोक्याची घंटा

• श्री प्रफुल्ल खांबेटे
भ्रमणध्वनी - ९०२९७३०३२८

प्रगतीच्या मागे धावता धावता आपण आपलं स्वतःचे आयुष्य विसरूनच जातो आणि मग सुखाचा धावा करावा लागतो व तो करतांना आपल्या चुका उमगायला लागतात. या चुका टाळून धाप लागण्याची वेळ न यावी याकरिता...

कायद्यानुसार लग्नाचे मुलाचे वय २१ तर मुलीचे १८ वर्षे म्हणजे त्यात नक्कीच काहीतरी तथ्य असावे. पण जेव्हां घरात खरोखरीच लग्नाचा विषय सुरू होतो तेव्हा आपल्या तथाकथित उच्चवर्णियांमध्ये त्याला दुय्यम स्थान देवून शिक्षण, करियर ह्यालाच अनन्यसाधारण महत्त्व दिले जाते. त्यातल्या त्यात चित्पावन तर विचारूच नका! (करियर ह्या शब्दाची व्याख्या स्वतः व स्वतःच्या कुटुंबासाठी फक्त पैशांची रेलचेल एवढीच सोयीस्करपणे केली जाते) पण जसे शिक्षणाचे वय गेले की शिक्षण नाही तसेच लग्नाच्या बाबतीतही आहे हे आपण विसरतो. अजूनतरी आपली मुलं 'माझं लग्न केव्हा करणार? असे आईवडिलांना विचारण्याएवढे आपण पुढारलेले नसल्यामुळे एकतर प्रेमविवाह किंवा आईवडिलांच्या लक्षात येईस्तोवर मुले मी अजून सेटल नाही वगैरे पळवाटा शोधत बसतात.

एखादा/एखादी रु. तीन चार लाखाचं पॅकेज असतांना स्वतःला सेटल समजून लग्नाचे ठरवले तर तो/ती (२३,२४ वर्षे) चा बालविवाह करताय? मजा करू द्या हो लहान आहे अजून वगैरे किंवा ३.५० हे काय पॅकेज झाले? हल्ली काय होतंय त्यांत? मग जोडीदार नोकरी करणारा, करणारी पाहिजेच अथवा 'एवढ्या पॅकेजला चित्पावन काय मिळणार? इतरच बघा.' आता सेटल होणे याची व्याख्या काय? तर साहजिकच १ बीएचके, २ बीएचके व कमीत कमी ६ ते ७ चा पॅकेज. पण एवढे सेटल व्हायला वय किती होईल? व मग त्या वयाला हमी कोण घेणार? वरील सर्व गोष्टींसाठी २८, ३० वयापर्यंत थांबल्यावर मग मुलं व आईवडिल सगळेच हतबल, केविलवाणे!... Logically व Scientifically लग्नाचे मुलाचे सुयोग्य वय २१ ते २८ व मुलीचे १८ ते २५ वर्षे मानायला काय हरकत आहे? (Foreign मध्ये खुळचट कल्पनांमुळे डेट्स ची प्रथा पडली पण सुदैवाने इथे ती प्रचलित झाली नाही) मुळातच Foreign मध्ये binding प्रकारच नाही तिथे फक्त bonding आणि ते देखील Loose.

कितीही समानता आली तरी मुलं ही स्त्रीलाच होणार व ती योग्य वयात झाली तर समाजात सुदृढ - निकोप मुलं जन्माला येण्याचे प्रमाण वाढणार व त्या मुलांचे संगोपन करायला आई-वडिलांना शारिरीक व मानसिक ताकद राहणार!

साधारण कॉलेज प्रवेशातच हल्लीची मुलं/मुली कॉमन ग्रुप करतात व अती फ्रेन्डली वागतात इतके की समोरच्याला संकोचल्यासारखे व्हावे. फाजील स्वप्न व त्यामुळे वाढणारे वय, आईवडिलांची हतबलता ह्याचा परिणाम अशा सोशल फ्रेन्डशिपमध्ये होऊन मग माध्यमांचा गैरवापर व त्या अनुषंगाने येणारी व्यसने यामुळे आजची पिढी माहिती व ज्ञान मिळविण्याच्या दृष्टीने नशीबवान असली तरी हतबल व केविलवाणी झालेली जाणवते, कारण प्रत्येकालाच नैसर्गिक इच्छा व प्रकृती टाळता येत नाही. अशा वेळेला भरकटलेल्या आजच्या तरुण पिढीला नैराश्यातून वाचवून सन्मार्गी ठेवण्याकरीता योग्य वयात लग्न करून खंबीर व आनंदी बनवणे हे ज्येष्ठांचे कर्तव्य ठरते. संसार ही सुद्धा गरज आहे हे सत्य स्वीकारावेच लागेल.

आर्थिक स्थिती चांगली (सापेक्ष) असताना एखादा मुलगा/मुलगी लवकर लग्नाला उभी राहणं ही समाजाची अधोगती कि उर्जितावस्था?

आम्ही चित्पावन असे अभिमानाने सांगतो की पारश्यांच्या खालोखाल आमची Community आहे म्हणून इतके आम्ही संख्येने कमी आहोत (Community चा ऱ्हास) ही बाब नक्कीच अभिमानाने सांगण्यासारखी नाही आपली संख्या कमी म्हणजे नक्कीच (Society) समाजाचे नुकसानच. कारण तसा इतिहासच आहे चित्पावनांचा!

❖

## पुस्तक परिचय

# मुसाफिराच्या आठवणी


'मुसाफिराच्या आठवणी'

प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस लिखित या पुस्तकावरील एक अभिप्राय .....!

केल्याने देशाटन पंडित मैत्री, सभेत अन् संचार ।
ग्रंथशास्त्र विलोकन, मनुजा चातुर्य येतसे फार....।।

असे म्हटले जाते. 'मुसाफिराच्या आठवणी' या आपल्या पुस्तकात श्री. रमाकांत विद्वांस यांनी आयुष्यभर केलेल्या मुसाफिरीचा मनोज्ञ आलेख रेखाटला आहेच पण आपल्यासह वाचकांनाही जगभर मुसाफिरी केल्याचे समाधान मिळवून दिले आहे. अनेकवेळा परदेशवाऱ्या कामाच्या निमित्तानेच घडल्या. तरीही उत्साही वृत्तीमुळे प्रिय पत्नी शुभा हिच्यासहदेखील स्वतंत्रपणे विविध देशांना त्यांनी भेटी दिल्या. हे देशाटन त्यांनी अत्यंत डोळसपणे केल्याचे वाचकांनाही जाणवेल.

पुस्तकाच्या अगदी सुरुवातीला आपल्या पत्नीचे शिक्षण, तिचे सर्वांशी मिळून मिसळून वागणे, तिने आजारपणात आपली केलेली सेवा या विषयी लेखकाने अत्यंत जिव्हाळ्याने लिहिले आहे. श्री. रामाकांतांच्या वडिलांची आई सौ. सखुबाई, हिला तिच्या आत्याबाई सौ. रमाबाई रानडे यांनी दत्तक घेतले होते. रमाकांतांचे वडील श्री. माधवराव लहान असतांनाच सखुबाई यांचे देहावसान झाल्याने सौ. रमाबाईंनीच त्यांचे संगोपन केले. श्री. माधवराव हे कायदेपंडित होते. आपल्या समाजात, स्वतःचे डिंडिम न वाजवता, शांतपणे आपले काम करणाऱ्या व्यक्तींमध्ये त्यांची गणना करावी लागेल. त्यांनी लिहिलेल्या कै. रमाबाईंच्या चरित्रात त्यांचा अभ्यासू वृत्तीचे प्रतिबिंब पडलेले दिसते. हे इतके सविस्तर लिहिण्याचे कारण हेच की श्री. रमाकांतानीही पित्याच्या पावलावर पाऊल ठेवून लेखन केल्याची प्रचीती येते.




लेखक 'हिंदुस्तान कंस्ट्रक्शन कंपनी' (HCC) मध्ये इंजिनियर म्हणून रुजू झाले. भारत सरकारने HCC च्या सहाय्याने केलेल्या अनेकविध उल्लेखनीय बांधकाम प्रकल्पांत त्यांचा मोलाचा सहभाग होता. भिरा वीजनिर्मिती प्रकल्प, कोयना जलविद्युत प्रकल्प, यमुना हायड्रो इलेक्ट्रिक प्रोजेक्ट, कलकत्ता भुयारी मेट्रो रेल्वे प्रकल्प, तमिळनाडूतील पहिले स्टोरेज विद्युत निर्मिती केंद्र या व अशा इतर अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांवर त्यांनी काम केले आहे. तेथे आलेले बरेवाईट अनुभवही त्यांनी नमूद केले आहेत. इतकेच नव्हे तर त्या त्या ठिकाणाची माणसे, त्यांच्या जीवनपद्धती, राहणी, चालीरीती यांचेही यथार्थ चित्रण त्यांनी या पुस्तकात केले आहे. उदाहरणार्थ डी.बी.के रेल्वे प्रकल्पावर काम करणाऱ्या आदिवासींविषयीचे वर्णन – त्यांच्या झोपड्यांना दारे नसत. पण कोणी चोरी अथवा स्त्रियांशी अनैतिक वर्तन केल्यास मृत्युदंडाची शिक्षा असे. त्या भागात एक रुपयाला शंभर संत्री आणि पंचवीस पैशांना हातभार लांब फणस मिळत असे – अशा निरीक्षणांमुळे पुस्तक वाचनीय झाले आहे.

लेखकाने कामाच्या निमित्ताने जगभर प्रवास तर केलाच पण प्रिया पत्नी शुभासह युरोपचा प्रवासही केला. त्यांच्या पुस्तकात पूर्वेकडील जपान, मलेशिया तसेच मॉरिशस या देशांविषयीही बरीच माहिती मिळते. एक गमतीची गोष्ट म्हणजे मॉरिशसच्या लोकांचे हिंदी चित्रपट सृष्टीवर असलेले अतोनात प्रेम. लेखक म्हणतात की 'कहो न प्यार है' हे गाणं तिथे रात्रंदिवस ऐकू येई. देशाटनाबरोबरच भारतातील तिरुपती, श्रीशैल्यम, भद्रावती, वैष्णोदेवी आदी देवस्थानेही लेखकाने पाहिली आहेत.

रूढार्थाने हे प्रवासवर्णन नाही. आज वयाच्या ८०व्या वर्षी रमाकांत स्वतःच्या आयुष्याकडे मागे वळून पाहतात. त्यांच्या व्यक्तिमत्वाचा परिचय होतो तो पुस्तकाच्या अंतिम दोन प्रकरणांमधून. 'आम्ही असे कां?' आणि 'विधिलिखित' ही दोन प्रकरणे म्हणूनच विशेष वाचनीय. सी.ए. होऊ इच्छिणाऱ्या रमाकांतांना ती डिग्री मिळाली नाही. सैन्यदलात अधिकारी होण्याची इच्छा ही अपुरीच राहिली. हे असे का घडले हे वाचकांनी मुळातूनच वाचावे. थोडक्यात म्हणजे, प्रवासवर्णन आणि आत्मचरित्र यांचा सीमारेषेवर रेंगाळणारे हे एक हृद्य पुस्तक असून त्यातून एका समंजस व सुसंस्कृत व्यक्तीशी आपले ऋणानुबंध जुळतात.

– **डॉ. सौ. माधुरी पणशीकर**, मुंबई


**लेखक : श्री. रमाकांत माधव विद्वांस (पहिली आवृत्ती) प्रकाशक : मॅजेस्टीक पब्लिशिंग हाऊस, अशोक केशव कोठावळे ● पृष्ठसंख्या : १७३ ● मूल्य : ३५० रु. ● दूरध्वनी : ०२२-२४३०५२६०**

# महामार्गांच्या दर्जेदार आणि वेगवान निर्मितीसाठी भारतातील नऊ तज्ज्ञांची समिती

रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाचे केंद्रीय मंत्री माननीय श्री. नितीन गडकरी यांचा रस्ते आणि महामार्गांच्या दर्जेदार आणि वेगवान निर्मितीसाठी नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी कायम आग्रह असतो.

वरील उद्देश ध्यानात ठेवून रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने, मे २०१५ मधे, रस्ते आणि महामार्गांच्या दर्जेदार आणि वेगवान निर्मितीसाठी योग्य तंज्ञाने सुचवण्यासाठी भारतातील नऊ तज्ञांची समिती नेमली होती. आपल्या प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस हे या समितीत बोगदे निर्मितीतील तज्ज्ञ म्हणून या समितीत नियुक्त केले गेले होते.



मुख्य सल्लागार श्री. रमाकांत विद्वांस मा. मंत्री नितीन गडकरी यांच्या बरोबर चर्चा करताना

या समितीने तिचा अहवाल दि. ४ मे २०१६ रोजी, नवी दिल्लीत मानानीय मंत्र्यांना सदर केला. जवळजवळ अडीच तास चाललेल्या या सादरीकरणात माननीय मंत्र्यांनी प्रत्येक संबंधीत तज्ञाशी, त्याने सुचवलेल्या सर्व प्रस्तावांवर सखोल चर्चा केली.

श्री. विद्वांस यांनी मंत्रालयाने हाती घेतलेल्या बोगद्यांच्या प्रकल्पाबद्दल समाधान व्यक्त करताना यापुढेही जनहित लक्षात घेऊन, आणखीआणखीन नवीन बोगद्यांचा उपयोग दोन जागांना जोडणारा जवळचा मार्ग निर्माण करण्यासाठी आणि शहरातील वाहतुक सुकर करण्यासाठी करण्याची करावा असे सुचवले. तसेच या कामांसाठी मागवण्यात येणाऱ्या निविदातील अव्यवहार्य तरतूदी वगळण्यात याव्या आणि कलमे सुधारण्यात यावी असे सुचवले.

मंत्रीमहोदयांनी समितीच्या सूचना वाखाणण्याजोगी आहेत सांगत, समितीचे आभार मानले आणि त्या अंमलात आणण्याचा प्रयत्न करीन असे आश्वासन देऊन सभा संपवली. ❖

---

BOOK POST

If undelivered, Please return to

संपादिका : **डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई – ४०० ०३१.**

त्रैमासिक ‘हितगुज’ हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई – ४०० ०२५
या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादिका : डॉ. सौ. सुमेधा मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई – ४०० ०३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९
इ-मेल : **hitguj@marathepratishthan.org** • वेबसाईट : **www.marathepratishthan.org**